म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
वा. नं. 306

# बालोपयोगी इतिहास

१

# शिंदेशाही

लेखक

. शिरढोणकर, बी. ए.

REFBK-0004221

आ१ ३२९

आ१ २३२ नं.

बालोपयोगी इतिहास

१

# शिंदेशाही

४२२१

लेखक
र. वि. शिरढोणकर, बी. ए.
चालक 'दी एज्युकेशनल इन्स्टीट्यूट,'
'दी ग्वालियर पेन्टिंग वर्क्स' इ०

REFBK-0004221

किमत ०-६-० आणे

आ. ३९
आ. २३२

बालोपयोगी इतिहास

# १

# शिंदेशाही

४२२१
क्र.

लेखक
र. वि. शिरढोणकर, बी. ए.
चालक 'दी एज्युकेशनल इन्स्टीट्यूट,'
'दी ग्वालियर पेन्टिंग वर्क्स' इ०

REFBK-0004221

किमत ०-६-० आणे

प्रकाशक
दी एज्युकेशनल इन्स्टीट्यूट
जनकगंज, ग्वाल्हेर.

या पुस्तकाच्या भाषांतराचे, पुनर्मुद्रणाचे वगैरे सर्व हक्क
ग्रंथकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

मुद्रक,
देसाई आर्ट प्रिंटिंग प्रेस
ग्वालियर.

# समर्पण

श्रीमंत जीवाजीराव महाराज शिंदे,

आलीजाह बहादुर,

यांचे सेवेशीं.

# विषय-सूची


| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| "शिंदेशाही" चा इतिहास | ... | ... | ... |
| पूर्व परिचय | ... | ... | १ |
| राणोजी शिंदे | ... | ... | १ |
| जयाप्पा शिंदे | ... | ... | २ |
| पहले जनकोजी शिंदे | ... | ... | ३ |
| महादजी शिंदे | ... | ... | ५ |
| महादजी शिंदे ( पुढें चालू ) | ... | ... | ८ |
| दौलतराव शिंदे | ... | ... | ११ |
| महाराणी बायजाबाई शिंदे | ... | ... | १५ |
| दुसरे जनकोजीराव शिंदे | ... | ... | १७ |
| जयाजीराव शिंदे | .. | ... | १९ |
| माधवराव शिंदे ( पूर्वार्ध ) | ... | ... | २२ |
| माधवराव शिंदे ( उत्तरार्ध ) | ... | ... | २५ |
| श्रीमंत सरकार जिवाजीराव शिंदे | | ... | २८ |
| परिशिष्ट—अ ( ग्वाल्हेरचें भौगोलिक वर्णन ) | | .. | ३० |
| परिशिष्ट—ब ( कौन्सिल आफ रीजन्सीची साधारण माहिती ) | | | ३३ |
| परिशिष्ट—क ( शिंदे घराण्याचा वंशवृक्ष ) | | ... | ३९ |

४२२१
ह्री. क्र.

छत्रीबाजार
लष्कर, ग्वाल्हेर.

# "शिंदेशाही"चा इतिहास.

१९२५ आणि १९३०

पांच वर्षांपूर्वी हातीं घेतलेलें काम आज पूर्ण होऊन बाहेर पडत आहे.

१९२५ मध्यें कै. माधवराव महाराज शिंदे यांचें एक लहानसें चरित्र लिहावयास बसलों व पुरेशी माहिती गोळाकरून तें दोन महिन्यांच्या अवधींत लिहूनही काढलें. लिखाणाच्या क्षेत्रांत नवीन पाऊल टाकणाऱ्या हुकलेल्या प्रवाशास जगाचा जो अनुभव येतो त्या अनुभवास प्रस्तुत लेखक किंवा त्याचें लिखाण मुळींच अपवाद ठरलें नाहीं. जो अनुभव यावयाचा तोच आला. यामुळें क्वचित् मन उद्विग्न होई, तर क्वचित् जगाच्या सम-विषमतेकडे पाहून हंसूंही येई. असो.

. पुढें बऱ्याच काळपर्यंत तें चरित्र तसेंच पडून राहिलें. मध्यंतरीं कितीतरी भानगडी उपस्थित झाल्या व नंतर या चरित्राचें स्वरूपच एकदम पालटावें असें मनाला वाटलें आणि पटलें. म्हणून त्या दिशेनें कार्यास सुरुवात केली, आणि शक्य तितकी माहिती गोळाकरून, सत्यान्वेषणाविषयीं बरीच खबरदारी घेऊन, इतिहासाचें तत्व कायम ठेऊन, ही "**शिंदेशाही**" विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं लिहून काढिली. हें पुस्तक लिहीत असतांना ज्या ज्या ग्रंथकारांची मला मदत झाली त्या सर्वांचा मी फार आभारी आहें.

"शिंदेशाही"नें इतिहासांत कोणतीही नवीन भर घातली आहे असें नाहीं. परंतु पहिल्या बाजीच्या गाजी समशेरीच्या प्रभावळींत तळपणाऱ्या राणोजी शिंद्यांच्या वंशाचा संकलित इतिहास थोडक्यांत सांपडण्यास "**शिंदेशाही**" अवश्य मदत करील. '**परिशिष्टें**' उपयुक्ततेच्या दृष्टीनें घातलीं आहेत. यांमुळें हें पुस्तक वाचून ग्वाल्हेर संस्थानाविषयीं कोणासही साधारण माहिती होण्यास अडचण पडणार नाहीं; आणि हेंच ध्येय समोर ठेवून "**बालोपयोगी इतिहासा**"चीं पुढील पुस्तकें प्रकाशित होणार आहेत.

हा प्रयत्न कितपत साधला हें पहाणें तज्ञांचें. कित्येक गोष्टी नमूद करावयाच्या राहिल्या असतील; कित्येकांना फाजील महत्व मिळालें असेल, कित्येक मुळांत नसतील देखील. या सर्व चुकांचें कारण सर्वांशीं जरी नसलें तरी बव्हंशीं "साधनांचा अभाव" हें होय. "शिंदेशाहीच्या इतिहासाचीं साधनें" प्रकाशित होत आहेत, हें गृहित धरिलें तरी एकदोन खंडांत सर्वच मुद्यांचा निकाल लागेल हें संभवत नाहीं. या करितां तज्ञांकडून चुकांबद्दल सूचना आल्यास लेखक त्यांचा अत्यंत ऋणी होईल.

प्रथमारंभींच श्री व्ही. जी. अम्बर्डेकर बी. ए.,डी. आय. जी. एज्युकेशन डिपार्टमेंट (ग्वाल्हेर), यांनीं स्नेहभावानें दाखविलेली कळकळ खरोखरच स्पृहणीय होय. त्याबद्दल त्यांचा साभार उल्लेख करणें जरूर आहे. पुस्तकाच्या पुनर्लेखनापासून तें छापून निघेपर्यंत माझे मित्र श्री. शंकर दत्तात्रय मेंडसुरे यांनीं निरलस वृत्तीनें केलेल्या सहाय्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. अतिशय थोड्या वेळांत पुस्तक सुबकरीतीनें छापून दिल्याबद्दल श्री. श्रीधर रामचंद्र देसाई यांचे व ब्लॉक दिल्याबद्दल डॉ. मा. दा. पुस्तके यांचे आभार मानणें जरूर आहे.

आतां एकाच व्यक्तिविषयीं कृतज्ञता प्रगट करावयाची राहिली आणि ती ह्मणजे ती. रा. रा. विष्णु सखाराम शिरढोणकर यांचेविषयीं. स्वतः अतोनात कष्ट सोसूनही दुसऱ्याच्या उद्विग्न झालेल्या मनाला वेळोवेळीं कार्यप्रवृत्त करणारा यांचा ओजस् उपदेश आणि प्रेमळ आशीर्वाद यांचें फळ ह्मणजेच प्रस्तुत कृति होय. याबद्दल त्यांचे औपचारिक आभार न मानतां त्यांच्याविषयीं अनौपचारिक कृतज्ञता बुद्धि व्यक्त करून त्यांची रजा घेतों.

अतिशय घाईत पुस्तक छापून निघाल्यामुळें शुद्धाशुद्धतेसंबंधीं कांहीं चुका रहाणें स्वाभाविक आहे. परंतु त्या विषयीं उदार वाचकांची नम्रभावानें क्षमा मागून श्री. जिवाजीराव महाराज शिंदे यांस उदंड आयुष्य द्यावें अशी जनस्वरूप जनार्दनाची प्रार्थना करून रजा घेतों.

माधव जयंती
२६-१०-३० }

र. वि. शिरढोणकर.

४२११

# शिंदेशाही

## पूर्व परिचय.

शिंदे हे राजपुतांचे वंशज होत. दक्षिण हिंदुस्थानांत भरभराटीस आलेल्या वहामनी राज्याचे हे एकनिष्ठ शिलेदार होते. त्यावेळेपासून साताऱ्याहून पूर्वेकडे १६ मैलावर असलेल्या कण्हेर खेड नांवाच्या गांवची पाटिलकी शिंद्यांकडे होती. दिल्लीच्या बादशहा कडून या घराण्यास ५००० ची मनसब देखील होती. छत्रपती शाहू महाराजांचा विवाह या घराण्यांतील सावित्रीबाईशीं झालेला होता. मोंगल बादशाही, अवरंगजेब बादशहा नंतर मोडकळीस आल्यामुळें नेमाजी शिंद्यास—त्यावेळचे मुख्य पुरुष—संकटांत दिवस काढावे लागले; म्हणूनच त्यांचा शेवट इतिहासांत सांपडत नाहीं.

## राणोजी शिंदे.

शिंदेशाहीचे संस्थापक राणोजी शिंदे यांचा जन्म इ. सन १६१४ त झाला. यांचे वेळीं हें घराणें अगदींच खालावलें होतें. त्या मुळें पोटाकरितां म्हणून राणोजीस पेशव्यांची हुजरेगिरी पत्करावी लागली. परन्तु तो काळ स्वपराक्रमाचा होता. कर्तबगारी अंगांत असल्यावर मनुष्य थोर पदास तेव्हांच चढत असे. ही निकृष्ट चाकरी राणोजीनें इतक्या स्वामिभक्तीनें बजाविली कीं श्रीमंत पहिले बाजीराव पेशव्यांनीं राणाजीस आपल्या पथकांतील शिलेदार नेमिलें.

या नंतर राणोजीची कर्तबगारी पाहून पेशव्यांनीं इ. स. १७२७ त राणोजीस मल्हारराव होळकराप्रमाणें माळव्यांतून चौथ वसूल करण्याकरितां धाडिलें. पुढें राणोजी शिंदे श्रीमंत बाजीराव पेशव्यांबरोबर दिल्ली पर्यंतही गेले. दिल्लीहून परत येतांना भोपाळ मुक्कामीं मराठ्यांचें निजामाशीं निकराचें युद्ध झालें व निजाम हरला. पुढें राणोजी शिंदे श्रीमंत बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजी अप्पा, यांचे बरोबर वसईच्या वेढ्यांत देखील हजर होते.

या प्रमाणें कित्येक ठिकाणीं राणोजीचा अतुल पराक्रम पाहून श्रीमंत बाजीराव पेशवे फार खुष झाले, व त्यानीं माळव्यांत जिंकलेल्या प्रांतापैकीं साडे पांसष्ट लक्षाच्या महालावर राणोजीस सुभेदार नेमिलें. हीच जहागीर ग्वाल्हेर संस्थानची कोनशिला होय.

राणोजी शिंद्यांची राजधानी उज्जयिनी होती. त्यांनीं आपली जहागीर उत्तम रितीनें सांभाळली. राणोजीच्या पराक्रमानें उत्तरेकडील, राजपूत, जाट, मुसलमान यांवर मोठा दरारा बसला, व दिल्लीच्या राजकारणांत मराठ्यांचा प्रवेश झाला. राणोजी शूर, वीर व धाडसी होते. हे इ. सन १७४५ त शुजालपुरास मरण पावले. तेथें त्यांची छत्री आहे.

## जयाप्पा (१७४५ ते १७५९).

राणोजी शिंद्यांना तीन–जयाप्पा, दत्ताजी व ज्योतीबा–औरस पुत्र, व दोन–तुकोजी आणि महादजी–दासीपुत्र होते. त्यां पैकीं तुकोजी आपल्या वडिलांसमोरच मरण पावला. राणोजी नतर सरदारीचीं वस्त्रें जयाप्पास मिळालीं. बापाप्रमाणेंच मुलगाही विलक्षण शूर व धाडसी होता. त्याच्या आत्मविश्वासाचें व शौर्याचें तर मराठे लोक इतकें कौतुक करीत कीं, त्यास सर्वजण 'अर्जुन' म्हणून प्रेमानें हांक मारीत.

जयाप्पा शिंदे व मल्हारराव होळकर मिळून दिल्ली पर्यंत चालून गेले. त्यांनीं रोहिले लोकांचा पराभव केला. तेव्हांपासून

जाट, राजपूत, रोहिले वगैरे शत्रूंपासून बादशहाचें संरक्षण करणें मराठ्यांच्या अंगावर पडलें; व बादशहाच्या सिंधू नदी पर्यंतच्या प्रांताची चौथ व सरदेशमुखी दोन्हीं जयाप्पा शिंद्यांस मिळालीं.

मारवाडांतील विजय:—राजपूत लोकांत गादी विषयीं नेहमीं तंटे चालत. जोधपूरचा राणा रामसिंग यास पदच्युत करून, त्याची गादी त्याचा चुलत भाऊ विजयसिंग यानें बळकाविली होती. राजपूत लोक जयाप्पास 'हप्पा' म्हणत. पेशव्यांचे आज्ञेप्रमाणें जयाप्पा रामसिंगच्या मदतीस गेला. त्यानें विजयसिंगास नागोरच्या किल्ल्यांत कोंडून टाकलें. परंतु एके दिवशीं विजयसिंगानें जयाप्पावर मारेकरी घालून त्यास ठार मारविलें. जयाप्पाचा असा अमानुष रीतीनें झालेला खून पाहून त्याचा मुलगा जनकोजी व भाऊ दत्ताजी यांचें पित्त खवळलें. त्यांनीं विजयसिंगावर निकराचा हल्ला करून राजपुतांचा धुव्वा उडवून दिला, व विजयसिंगापासून एक कोट रुपये व अजमेर प्रांत खंडणी दाखल घेतला.

## पहिला जनकोजी शिंदे (१७५९ ते १७६१).

जयाप्पा नंतर त्याचा मुलगा जनकोजी हा शिंद्यांच्या गादीवर आला. त्याचा जन्म इ. स. १७४१ त झाला. त्या बालवीराची थोरवी कोठवर गावी त्यानें आपल्या बापाच्या खुनाचा सूड घेतला व राजपूत, जाट, रोहिले व पठाण यांना अगदीं 'त्राहि भगवन्' करून सोडिलें.

अहमदशाह अबदालीनें हिंदुस्थानवर स्वारी केल्यानें बादशहाचें संरक्षण त्याच्या शत्रुपासून करणें मराठ्यांचें कर्तव्य ठरलें होतें. म्हणून राघोबादादांनीं १७५८ त पंजाबावर स्वारी केली. त्यांचे बरोबरच दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे हेही होते. दिल्ली सर झाली, व मराठ्यांचे घोडे सारा पंजाब पादाक्रांत करून अटकेस पाणी प्याले, आणि मराठ्यांचें ऐश्वर्य अगदीं कळसास पोहोंचलें.

यमुनेची लढाई:—पुढें राघोबादादांनीं पंजाब प्रांताची व्यवस्था राखण्या करितां दत्ताजी शिंद्यांस ठेवून आपण दक्षिणेंत परत गेले. परंतु मुसलमानांस मराठ्यांचें हें वर्चस्व सहन न होऊन त्यांनीं अहमदशहा अबदालीस परत बोलाविलें. त्यानें सरळ दुआबांत दत्ताजीच्या अंगावर लगट केली. तीन तीन वेळां विनंती करून देखील मल्हारराव होळकरानें त्यांस मदत केली नाहीं. त्यामुळें दत्ताजी शिंद्याला एकटेंच तोंड देणें भाग पडलें. शेवटीं काका व पुतण्यानें निश्चय करून मराठ्यांची इभ्रत राखण्याचें ठरविलें. १७६० त शिंद्यांच्या फौजेची व अबदालीची यमुना नदींत गांठ पडून दत्ताजी शिंदा मारला गेला. त्याचें डोकें मुसलमानांनीं कापून नेलें. जनकोजीही गोळी लागून जखमी झाला. परंतु त्याचे सह शिंद्यांच्या फौजेने पळ काढला.

पानीपतचा रणसंग्राम १७६१:—दत्ताजी शिंद्याच्या मरणाची बातमी पुण्यास कळतांच, भाऊ साहेब जंगी तोफखाना, मोठ मोठे बलाढ्य सरदार, व दोन लक्ष सैन्य घेऊन उत्तरेकडे निघाले. पावसाळ्यांत मराठ्यांनीं दिल्ली हस्तगत करून तेथेंच मुक्काम केला. अबदाली यमुने पलीकडे होता नदीस उतार नव्हता तरी नदीच्या बाजूनें उत्तरेस जाऊन कुंजपुरा म्हणून अबदालीचें मजबूत ठाणें जनकोजी शिंद्यानें मोठ्या चातुर्यानें सर केलें. परंतु पुढें भाऊसाहेबांचा दक्षिणेकडील संबंध सुटला व त्यास रसद मिळण्याचीही पंचाईत पडूं लागली.

यामुळें भाऊंनीं वैतागून उठावाचें धोरण स्वीकारलें, व ता. १४ जानेवारी १७६१ रोजीं अबदालीवर हल्ला केला. बराच वेळ पर्यंत मराठ्यांची सरशी होती. परतु विश्वासरावास गोळी लागून ते पडल्यानें, भाऊ बेफाम होऊन युद्धांत शिरले. मल्हारराव होळकरासारखीं विश्वासाचीं माणसें जरी बेईमान झालीं, तरी शिंद्याच्या मनांत किंतु केव्हांही उप्तन्न झाला नाहीं. शिंदे,

कुळांतील नररत्न म्हणजे स्वामीभक्तीचा पुतळा. 'धनी ते चाकर' हाच त्यांचा बाणा; आणि याच बाण्याला अनुसरून २० वर्षांचा जनकोजी शिंदाही भाऊंच्या मागोमागच होता दोघांनींही अतुल पराक्रम गाजविला. पण सेनापतीच्या अविचारी धोरणामुळें मराठ्यांचा संहार होऊन, अबदालीस जय मिळाला व जनकोजीचा अमानुष रीतीनें इ. स १७६१ त वध करण्यांत आला.

## महादजी शिंदे. (१७६१ ते १७९४)

आजच्या ग्वाल्हेर संस्थानचे मूळ संस्थापक राणोजी शिंदे खरे. परंतु ज्या काळीं, शिंदेशाही वैभवाच्या कळसाला पोहोंचली तो काळ म्हणजे महादजी शिंदे उर्फ पाटीलबाबा यांची यशस्वी कारकिर्द होय.

रणभूमीचा त्याग:—आवडत्या महाराष्ट्र-धर्मा करितां भाऊ आणि जनकोजी यांनीं दिलेली प्राणाहुती पाहून राणोजी शिंद्यांचा वंशच्छेद होत आहे असें महादजीस वाटलें:—"स्वधर्माकरितां प्राण खर्ची घालणें, हें क्षत्रियांचें कर्तव्य खरें. पण निरर्थक प्राण देणेंही तितकेंच मूर्खपणाचें असतें. असंख्य मराठे वीर समरांगणीं पडले असतांना, मी एकटाच महाराष्ट्र विजयलक्ष्मी याच क्षणीं परत आणूं शकत नाहीं जगलों व भवानी मातेनें कृपा केली, तर मराठ्यांच्या कलंकित कीर्तीला परत उज्वल करूं."

भाऊसाहेब व जनकोजी शिंदे दिसेनासे झाल्यावर महादजी शिंद्यांनीं हा विचार ठरवून रणभूमीचा त्याग केला. परंतु एका देखण्या घोडीवर एक स्वार पळून जात आहे, असें दोघा पठाणांनीं पाहिलें व त्यांचा पाठलाग केला. पाटील बाबांची 'बिजली' त्यांना घेउन वाऱ्याप्रमाणें सूं सूं करीत पळत सुटली. पठाणांचा निभाव लागेना. पण एका ओढ्याला नाकीत असतांना घोडी पाय चुकून ओढ्यांत पडली. इतक्यांत पठाणांनीं येऊन गांठलें. या दंग्यांत महा-

राजांचा एक पाय जाया झाला व त्यांचीं मूल्यवान वस्त्रें व घोडी पठाण घेऊन गेले. कांही वेळानंतर राणेखां नांवाचा गृहस्थ भिस्त्या च्या वेशांत तिकडून निघाला. त्यानें महाराजांना ओळखून आपल्या बैलावर घातलें व दक्षिणेंत आणून सोडलें. या उपकाराबद्दल महाराजांनीं पुढें त्यास जहागीर दिली.

सरदारीचीं वस्त्रें व उत्तर हिंदुस्थानावर स्वारीः—दक्षिणेस पोहोंचल्यावर श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांनीं शिंद्यांची जहागीर व सरदारीचीं वस्त्रें महादजीस दिलीं. दोन तीन वर्षे महादजी दक्षिणेंतच होते. परंतु वीर पुरुषाला स्वस्थ बसवत नाहीं. त्यांचें सुख म्हणजे चैतन्य. पानीपतच्या लढाईमुळें माळव्याचा बराच भाग मराठ्यांच्या ताब्यांतून गेला होता. तो महादजी शिंद्यांनीं इ. स. १७६४ त परत घेतला.

वरील मोहिम अर्धवट राहिल्यानें इ. स. १७६९ त महादजी शिंदे व विसाजी कृष्ण बिनीवाले ह्यांची दुकल राजपुतान्यांतून चौथ वसूल करीत रोहिलखंडाकडे वळली. उत्तरेकडील मराठ्यांचा अम्मल पूर्वीप्रमाणें चालू करून 'दिल्ली' हस्तगत करावी, शहा-अलम बादशहा सिंहासनावर नव्हता त्यास दिल्लीस आणून तक्तावर बसवावें व नंतर त्याचेपासून जयाप्पा शिंद्यांशीं झालेला तह पूर्ण करून घ्यावा ही महत्वाची कामगिरी श्रीमंत माधवराव पेशव्यांनीं महादजीस सांगितली होती. महादजी शिंद्यांनीं राजपूत जाट, मुसलमान यांनीं बळकावलेला मराठ्यांचा मुलूख परत घेतला. व चौथाई हक्काची थकलेली बाकी वसूल केली.इ स. १७७१ त शहा-अलम बादशहास इंग्रजांपासुन सोडवून दिल्लीच्या गादीवर बसविलें. नंतर नजीबउद्दौल्याचया सूड घेण्याकरितां महादजी शिंदे रोहिलखंडाकडे वळले. नजीबाचा मुलगा झाबताखान ह्याचा पराभव करून, त्याचा गंगा-यमुना मधील दोआब प्रांत उध्वस्त

केला आणि पानीपतच्या युद्धांत रोहिल्यांनीं लुटलेली सर्व संपत्ती काबिज केली.

पेशवाईचा गृह-कलहः—उत्तरेकडे या प्रमाणें मराठेशाहीचा महादजी शिंदे जम बसवीत असतां श्रीमंत थोरले माधवराव पेशवे इ. स. १७७२ त अकालीं मरण पावले, ह्मणून महादजीस दक्षिणेस जावें लागलें. माधवरावानंतर पेशवाईचीं वस्त्रें नारायणरावांस मिळालीं.

परंतु 'ध' चा 'मा' करून राघोबादादा ह्यांची बायको आनंदीबाई हिच्या कारस्थानानें भर दोन प्रहरीं पेशव्यांच्या वाड्यांत नारायणराव यांचा खून झाला, व पेशवाईचीं वस्त्रें राघोबास मिळालीं ही गोष्ट न आवडून नाना फडणवीस, सखाराम बापू, त्रिंबकराव मामा पेठे, महादजी शिंदे, रामशास्त्री प्रभुणे इत्यादि बारा मुत्सद्यांनीं कारस्थान आरंभिलें. यास बारभाईचें कारस्थान म्हणतात. नारायणरावांची पत्नी गंगाबाई ही त्यावेळीं गरोदर होती. तिला पुत्ररत्न होईल ह्या आशेवर तिच्या नांवें पेशवाईचीं वस्त्रें सातार्‍याहून आणून बारभाईनीं राज्य-कारभार सुरू केला.

राघोबा त्यावेळीं कर्नाटकाकडे होता. वेळ पाहून हरिपंत फडके व त्रिंबकराव मामा पेठे यांनीं राघोबावर शस्त्र उचललें. राघोबानें पळ काढला. तो सुरतेस गेला व तेथें त्यानें इंग्रजांची मदत घेतली.

इंग्रजांचें मराठ्यांशीं पहिलें युद्धः—मुंबई सरकार व राघोबा यांचा सुरतेस तह झाला. परंतु तो कलकत्याच्या गव्हर्नर जनरलनें अमान्य करून पुणें सरकारशीं दुसरा तह पुरंदर मुक्कामीं केला. शेवटीं हे दोन्हीं तह रद्द ठरून इंग्रजांचें मराठ्यांशीं पहिलें युद्ध जुंपलें.

या युद्धांत इंग्रजांचा बरेच ठिकाणीं पराजय झाला. महादजीनें तर वडगांव येथें इंग्रजांची हड्डी चांगलीच नरम केली व इंग्रजांस

अपमानकारक असा वडगांवचा तह कबूल करावयास लावलें. पण हा तह इंग्रजांस आवडला नाहीं. राघोबा पुन्हा पळून इंग्रजांकडे गेला. नानांची मुत्सद्देगिरी आणि हरिपंत व महादजी या जोडीचा गनीमी कावा यांनीं इंग्रजांची दाणादाण उडविली. अखेर महादजीच्या मध्यस्थीनें सालपे येथें तह झाला. तहाच्या अटी दोन्हीं पक्षांकडून बरोबर पाळल्या जाव्या म्हणून महादजी शिंदे जामीन होते.

## महादजी शिंदे (पुढें चालू).

कर्तव्याची दिशा बदलली:—इंग्रजांशीं झालेल्या पहिल्याच युद्धांत चांगल्या चकमकी उडाल्यामुळें महादजी शिंद्यांच्या कर्तव्याची दिशा बदलली. आजपर्यंत ते पेशव्यांचे सरदार होते; पण या पुढें ते स्वतंत्र झाले इंग्रजांच्या फौजेंतील शिस्त व कवाईत यांपासून होणारे फायदे महादजीच्या चटकन् लक्षांत आले; आणि इंग्रजांना जिंकण्याकरितां कवाईत शिकलेली पलटणेंच हवींत असें जाणून आपली फौज यूरोपियन पद्धतीवर तयार करण्याकरितां महादजी शिंद्यांनीं कित्येक फ्रेंच अधिकारी नेमिले. त्यांत डी. बॉयन हा मुख्य असून त्यास ४००० रुपये पगार होता.

दिल्लीचें राजकारण:–सालपेच्या तहानंतर महादजीनें आपला मोर्चा दिल्लीकडे वळविला. मोंगल साम्राज्य अगदीं मोडकळीस आलें होतें. दिवाणगिरी बद्दल नेहमीं भांडणें चालत. बादशहाचें मुळींच वजन नव्हतें. महादजी शिंद्यांनीं या बेबंदशाहीचा चांगलाच उपयोग करून घेतला व दिल्लीस शांतता प्रस्थापित केली. यामुळें दिल्लीचीं राज्यसूत्रें महादजीच्या हातीं आलीं. शहाअलम बादशहानें त्यावेळीं प्रसन्न होऊन शिंद्यास 'वकील-ई-मुतालिक' ही पदवी दिली. परंतु महादजीच्या विनयानें ती पदवी पेशव्यांस दिली जाऊन महादजीनें त्यांची नायबगिरी पत्करिली.

चाकसानचें युद्धः—या खटपटींत महादजीस पैशाची फार आवश्यकता भासूं लागली. त्यामुळें त्यांनीं दिल्लींतील कित्येक सरदारांच्या जहागिरी जप्त केल्या. या मुसलमान सरदारांनीं राजपूत व भरतपुरचे जाट यांस आपल्याकडे वळवून महादजी विरुद्ध कारस्थान रचिलें. बापूजी शिंद्यांनीं जयपुराहून राजपुतां-कडून खंडणी वसूल करून आणली. परंतु इकडे इस्माइलखान सर-दारानें आग्र्याला वेढा दिला. त्या वेळीं तेथें लखबा दादा बक्षी होते. त्यांनीं थोड्या लोकांनिशीं किल्ल्याचें संरक्षण फार शौर्यानें केलें. बंडवाल्यांची व शिंद्यांची गांठ चाकसान येथें पडली. त्या युद्धांत जाट व मुसलमान यांचा पूरा पराभव झाला. या विजयामुळें शिं-द्यांचा मुसलमानांवर व राजपुतांवर विलक्षण जरब बसला, म्हणून ही लहानशी लढाई शिंदेशाहीच्या इतिहासांत फार महत्वाची आहे.

गुलाम कादरः—या वेळीं महादजी शिंदे मथुरेस होते. हर-लेल्या बंडवाल्यांना रोहिल्यांचा सरदार गुलामकादर यानें आश्रय दिला, व दिल्लीस येऊन त्यांनीं नासधूस मांडली. गुलाम कादराच्या क्रूरपणाची मजल बादशहा शहाअलम याचे डोळे काढण्यापर्यंत गेली. शिंद्यांना हें कळतांच त्यांनीं येऊन दिल्ली सर केली, व गु-लाम कादरास ठार मारिलें बादशहाच्या शत्रूचा असा सूड घेतला म्हणून त्या अंधळ्या बादशहानें या खेपेस शिंद्यांना 'मदारुलमुहाम अलीजाह बहादर' हा किताब दिला.

राजपुतान्यांतील विजयः—बापूजी शिंद्यानें जरी जयपुराहून खंडणी आणली होती तरी राजपुतांची रग अजून जिरली नव्हती. म्हणून डी. बॉयन यांस महादजी शिंद्यांनीं राजपुतान्यांत पाठविलें जयपुर व जोधपूरचे राजपूत एकत्र झाले होते. पाटण येथें निकराचें युद्ध झालें. लखबा दादा बक्षी व डी. बॉयन यांच्या हुशारी मुळेंच शिंद्यांस जय प्राप्त झाला, पण प्रदेश रुक्ष असल्यानें नुकसान भयं-

कर झालें. शेवटीं मेरठा येथें झालेल्या युद्धांत राजपूत हतवीर्य होऊन महादजी शिंद्यांस शरण आले व अजमेर प्रांत शिंद्यांचे राज्यांत सामिल झाला.

पुण्याचा दरबारः—या प्रमाणें उत्तर हिंदुस्थानांत आपल्या धन्याची चाकरी उत्तम रितीनें बजावून महादजी शिंदे पुण्यास पोहोंचल्यावर पाटीलबावांनीं भर दरबारांत श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांना बादशहा शहाअलम कडून आलेले पोशाख व पदवी अर्पण करून, आपण स्वतः श्रीमंतांचे जोडे घेऊन उभे राहिले. हा त्यांचा विनय पाहून दरबारी पुणेकर मंडळी आश्चर्य-सागरांत पोहूं लागली.

नाना फडणीस व महादजी यांच्यांतील चुरसः—परंतु हा नम्रपणाचा कावा नानाफडणीसांनीं तेव्हांच ओळखला. शेवटीं एक दिवस महादजी शिंद्यांनीं श्रीमंतांस एकटें पाहून आपली महत्वाकांक्षा प्रगट केली कीं, पेशवाईचीं सूत्रें माझ्या हातून चालावींत. परंतु श्रीमंतांनींही प्रसंगावधान राखून चोख उत्तर दिलें "पाटीलबाबा, नाना जर आमचा उजवा हात आहे तर तुम्ही आमचा डावा हात आहांत. राज्याभिवृद्धीकरितां दोघांचीही आह्मांस सारखीच गरज आहे" पुढें हरीपंत फडक्यांच्या मध्यस्थीनें ही चुरस नाहींशी होऊन दोघांची मनें शुद्ध झालीं.

देहान्तः—पुण्याचें काम संपल्यावर महादजी शिंदे वानवडीस त्यांचे फौजेचा तळ होता तेथें जाऊन राहिले. तेथें त्यांना नवज्वर आला व त्या ज्वरांतच मराठेशाहीच्या ह्या आधार-स्तंभाचा व कर्त्या पुरुषाचा अंत झाला. इ. स. १७९४.

महादजींची योग्यताः—या वेळीं महादजीचें वय ६४ वर्षांचें होतें. ते शरीरानें किंचित् स्थूल, काळेसांवळे व सदा हंसतमुख असत. पानीपतच्या लढाईंत त्यांचा एक पाय अधू झाला होता.

लां.

महादजी शिंदे फार महत्वाकांक्षी असून, आपले काम काढण्या-करितां प्रसंगानुरूप वागणारे होते. हिंदु-मुसलमानांचा भेदभाव त्यांचे दरबारीं नव्हता, पण ते श्रीकृष्णाचे परम भक्त होते; ह्मणूनच त्यांनीं आपली राजधानी मथुरेस ठेवली होती. शिंद्यांची कवाईत शिकलेली फौज इतकी तयार होती कीं, तिचा इंग्रजांस देखील फार वचक होता. परन्तु दुर्दैवानें मनांतील हेतू सिद्धीस जाण्या पूर्वींच निर्दय काळानें त्यांचेवर झडप घातली.

## दौलतराव शिंदे ( १७९४ ते १८२७ ).

दत्तविधान व सरदारीचीं वस्त्रें:–महादजी शिंद्यांना एक देखील औरसपुत्र नव्हता. त्यांना एक बाळाबाई नांवाची मुलगी मात्र होती. तिचा विवाह लाडोजीराव शितोळ्यांशीं झाला होता. ग्वाल्हेरचे सरदार मोठे शितोळे यांचे हे पूर्वज होत. परंतु त्यांचें प्रेम तुकोजी शिंद्यांचे नातू आनंदराव यांजवर फार असल्यानें पाटीलबाबांच्या मरणांनंतर आनंदरावासच दत्तक घेण्यांत आलें, व त्यांचें नांव "दौलतराव" ठेविलें गेलें. पेशव्यांनींही हें दत्तविधान मान्य केलें. दौलतरावाचा जन्म १७८० त झाला होता त्या काळच्या पद्धती प्रमाणें त्यांचें शिक्षण चांगलेंच झालें होतें. त्यांना व्यायामाचा भयंकर नाद होता. त्यामुळें त्यांचें शरीर कसदार व डोळे पाणीदार दिसत. गादीवर आले तेव्हां त्यांचें वय १४ वर्षांचें होतें.

खर्ड्याची लढाईः—निजामाकडून चौथाईची बाकी बरीच थकली होती.. ती देण्याचें तो नाकारीत होता. म्हणून पेशव्यांनीं त्याचेवर स्वारी केली. नाना फडणीसांनीं सगळें मराठ-मंडळ एकत्र केलें, व खर्ड्याची लढाई झाली. त्या लढाईत शिंद्यांचे शूर सरदार जिवबादादा बक्षी यांनी अतोनात पराक्रम केला. म्हणूनच निजामाचा पराभव झाला. खर्ड्याचा जय म्हणजे मराठ्यांना विजय-

श्रीची शेवटची माळ होय; आणि मराठ-मंडळ राष्ट्रकार्याकरितां एकत्र झाल्याचा हा शेवटचाच प्रसंग होय.

बाजीरावाचें कारस्थान:-त्या वेळीं पेशव्यांचे गादीवर सवाई माधवराव असून कारभार नाना फडणवीस पहात असत. नानांचें वजन मराठे सरदारांत चांगलें असून दौलतरावाशीं नानांचा स्नेह होता. अशी बाहेरील स्थिती असतां खुद्द पेशव्यांच्या घरांत कलहाग्नी धुमसत होता. राघोबादादांचे चिरंजीव बाजीराव यांजवर नानांची कडक नजर असे. श्रीमंत सवाई माधवराव राज्यकारभार पहाण्यास योग्य पुरुष व्हावेत, म्हणून नाना त्यांनाही कडक शिस्तीनें ठेवीत. परंतु बाजीरावाच्या कारस्थानानें पेशव्यांस असें वाटलें कीं, नाना सर्वांना कैद्याप्रमाणें वागवीत आहेत. नानांचा तसा हेतू मुळींच नव्हता, त्यामुळें पेशव्यांचें मन उद्विग्न होऊन इ. स. १७९५ त माधवरावानें आत्महत्या केली.

नानांस कैद:—सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवेपद कोणास द्यावें या बद्दल बरीच वाटाघाट झाली. बाजीरावानें दौलतरावास अहमदनगर किल्ला देऊं केला. त्यामुळें नानानें कलहास भिऊन बाजीरावास कारभार सोंपविला. परंतु नानाविषयीं बाजीरावाचें मन शुद्ध नव्हतें. म्हणून दौलतरावाकडून बाजीरावानें नानांस कैद करविलें व दोन कोट रुपये देण्याचें कबूल केलें.

पुण्याची लूट:-बाजीरावास गादी मिळण्याच्या कारस्थानांत सर्जेराव घाटगे मुख्य होता. यानें आपली सुस्वरूप कन्या बायजाबाई हिचें आमिष दाखवून, शिंद्यांचे कारभारी बाळोबा तात्या यांची जागा पटकाविली. सर्जेरावाच्या अमदानींतच दौलतराव शिंद्यांचे कारकिर्दीस डाग लागणारे प्रकार घडून आले. नानांस कैद केल्यानंतर पुणें मुक्कामीं बायजाबाई व दौलतराव यांचा विवाह मोठ्या थाटामाटानें साजरा करण्यांत आला. त्यामुळें सर्जेरावास पैशाची

तूट पडली. म्हणून बाजीरावाकडून येणाऱ्या दोन कोट रुपयांबद्दल त्यानें तगादा लावला. इतका पैसा जवळ नसल्यानें बाजीरावानें पुणें लुटण्यास खुल्या दिलानें परवानगी दिली व सर्जेरावानेंही असला निंद्य प्रकार घडवून आणला.

नानांचा मृत्यू:—दौलतराव शिंद्यांजवळ फौज फार, त्यामुळें बाजीरावास त्यांचे तंत्रानें वागावें लागे. म्हणून बाजीरावानें त्यांसही कैद करण्याचा बेत केला. हें समजतांच दौलतरावानें नानांची सुटका केली. पुढें नाना लौकरच मरण पावले. त्यांच्या मृत्यूनें मराठ्यांच्या राज्यांतील शहाणपण व नीति लयास गेली.

शिंदे व होळकर यांचा विरोध:—तुकोजी होळकर मरण पावल्यावर त्याच्या मुलांमध्यें राज्याविषयीं तंटा उपस्थित झाला. पेशवे व शिंदे यांनीं तंटा न मिटवितां उलट दुफळी उत्पन्न केली. शिंदे व होळकर यांची पुणें येथें चकमक झाली व शिंद्यांनीं काशीरावास कैद केलें. यशवंतराव पळून गेला. त्यानें माळव्यांत जाऊन शिंद्यांची राजधानी उज्जयिनी जाळून टाकली. पुढें बाजीरावानें विठोजी होळकरास नानांच्या पक्षाचा ह्मणून हत्तीच्या पायांशीं दिलें त्यामुळें चवताळून यशवंतरावानें पुणें काबिज केलें. बाजीराव सिंहगडावर पळून गेला. यशवंतरावानें पुणें घेतांच सर्जेराव घाटग्यानें इंदुरास प्रलय चालविला; आणि शिंद्यांच्या नांवाखालीं तेथील प्रजेस भयंकर त्रास देऊन क्रूरकर्मात नादिरशहाची बरोबरी केली! या प्रमाणें सात आठ वर्षें पर्यंत सर्जेरावाचा शिंद्यांच्या दरबारीं पूर्ण अंमल होता. परंतु दौलतरावानें त्याचा लौकरच अंत केला.

मराठ्यांचें दुसरें युद्ध:—यशवंतराव होळकरानें पुण्यावर स्वारी केल्यामुळें बाजीराव पळून वसईस गेला. तेथें त्यानें इंग्रजांची मदत मागितली व मराठ्यांस लज्जास्पद असा वसईचा तह लिहून दिला. शिंदे, भोंसले वगैरे मंडळी स्वतंत्र होती, तरी पेशव्यांस ते

आपला धनी समजत असत. त्यामुळें दौलतराव शिंद्यांना हा तह कबूल झाला नाहीं. मराठ्यांचें स्वातंत्र्य राखण्याकरितां शिंदे कंपनी सरकारशीं सामना करण्यास तयार झाले. त्यांनीं नागपूरकर भोंसले यांसही आपल्या मदतीस बोलाविलें आणि मराठ-मंडळाची विस्कटलेली घडी पुनः नीट बसविण्याचा बराच प्रयत्न केला.

तहः—महादजी शिंद्यांनीं स्वकष्टानें तयार केलेल्या फौजेशीं सामना करणें इंग्रजांस देखील कठीणच होतें. परन्तु शत्रूचें कपटी कारस्थान व आमच्या कडील आपमतलबी लोक यांमुळें सर्वनाश झाला. इंग्रजांनीं अलीगढ येथील सैन्यास लांच दिली व तिला आपल्याकडे वळवून घेतलें. त्यामुळें दौलतरावाचा असई येथें पराभव झाला. भोसलेही वेळेवर मदतीस येऊं शकले नाहींत. शिंद्यांचा पुनः लासवारी येथें पराभव झाला. असा उत्तरेंत व दक्षिणेंत पराभव झाल्यामुळें दौलतरावानें सर्जे-अंजनगांवचा तह कबूल केला. या तहामुळें शिंद्यांचे इतर संस्थानिकांवरील सर्व हक्क नाहींसे झाले, चंबलनदी ही राज्याची सरहद्द ठरली व मराठ-मंडळ नामोहरम झालें.

राज्यव्यवस्थाः—नंतर शिल्लक राहिलेल्या राज्याची नीट व्यवस्था लावण्या करितां दौलतरावानें पुणें सरकारशीं तटस्थ-वृत्ति ठेविली. शोपूर तवरघारकडील ठाकूर लोक दंगे करण्यांत पटाईत ह्मणून त्यांस जेरीस आणून महाराजांनीं राज्यांत शांतता स्थापन केली. याच सुमारास देशांत पेंढारी लोक फार मातले होते. हे लोक देशभर धुमाकूळ घालून, चोऱ्या, खून व मारामाऱ्या करीत, त्यांचाही बंदोबस्त इंग्रजांच्या मदतीनें लवकरच करण्यांत येऊन शांतता प्रस्थापित झाली.

मोतीवालाः—या प्रमाणें राज्यकारभार आटोपून दौलतराव इ. स. १७२७ दिवंगत झाले. त्यांचे वय त्या वेळीं ४८ वर्षांचें होतें.

महाराज शरीरानें बलवान् असून उंच होते. ते डोईवर कंगणीदार पगडी बांधीत व पांढरा लांब अंगरखा घालीत असत. श्री अण्णा महाराज व श्री महिपतिनाथ ढोलीबुवा यांचे पासून महाराजांनीं गुरुमंत्र घेतला होता. महाराजांच्या पदरीं कित्येक कवीही होते. महाराणी बायजाबाई अतीशय सुंदर होत्या; पण त्याचप्रमाणें हुशार, कार्य-चतुर व व्यवहार-दक्षही होत्या. महाराजांचा पेहेराव जरी साधा असला तरी ते नेहमीं मोत्यांचा बहुमोल कंठा आपल्या गळ्यांत घालीत. मोत्यांचा तर त्यांना भारी शौक असे. त्यांचे वेळीं ग्वाल्हेर दरबारीं मोत्यांचा इतका संग्रह झाला कीं, शिंद्यांचें नांवच "मोतीवाला" पडलें. या प्रमाणें गृह-जीवन पूर्ण सुखमय असलें तरी स्वराज्य-भंगा बद्दल दौलतराव महाराजांना शेवटपर्यंत फारच वाईट वाटत असे.

## महाराणी बायजाबाई शिंदे.

बालपण व लग्नः—बायजाबाईचा जन्म इ स. १८७४त झाला यांच्या वडिलांचें नांव सर्जेराव घाटगे. बाईसाहेबांचा जन्म झाला त्यावेळीं चहूंकडे धुमाकूळ माजला होता. लहानपणीं कित्येक लढाया पहाण्याचे प्रसंग येत; अशी स्थिती असल्यानें नेहमीं युद्धास तयार रहावें लागत असे; आणि याच कारणामुळें लहान मुलें देखील शूर व धाडसी निपजत. या संस्कारामुळें बायजाबाई देखील घोड्यावर बसणें, भाला फेंकणें, इत्यादि लढाईच्या कामांत फार तरबेज होत्या त्यांचें सौंदर्य तर अप्रतिम होतें. पुढें बाईसाहेबांचा विवाह पुण्यास मोठ्या समारंभानें दौलतराव शिंद्यांशीं झाला; त्या वेळीं त्यांचें वय १४ वर्षाचें होतें. लग्न झाल्यानंतर शिंदे लौकरच उत्तरेकडे आले व त्यांनीं ग्वाल्हेरच्या किल्या नजीक आपल्या फौजेचा तळ दिला. त्याच छावणीचें हळू हळू वसतींत रूपांतर होऊन पुढें 'लष्कर' हें शहर निर्माण झालें. ( इ. सन १८१० )

राज्यकारभारः—इ. स. १८२७ पर्यंत बाई साहेबांनीं आपलें जीवन सुखपूर्वक व्यतीत केलें. पतीच्या मरणाच्या वेळेस सती जाण्याची त्यांची फार इच्छा होती. परंतु मरण समयींची पति-आज्ञा म्हणून बाईसाहेबांनीं राज्य-कारभार आपल्या हातीं घेतला. मुख्य मुख्य सरदारांच्या सल्ल्यानें बायजाबाईनें मुकुटरावास दत्तक घेतलें (सन १८२७) व त्याचें नांव जनकोजी असें ठेवण्यांत आलें. प्रथम बाई साहेबांनीं हिंदूरावबाबास आपला दिवाण नेमिलें. त्यांचे नंतर धार येथील बापूजी रघुनाथ हे दिवाण झाले. या शिवाय माधवराव अंबादास, माधवराव व रामराव फाळके, सेठ मनीराम लखमीचंद, आत्माराम शिवराम, रावसाहेब व दादासाहेब खासगीवाले, इत्यादि कर्ते पुरुष राज्यांत प्रमुख होते. बाईसाहेबांच्या शांत व व्यवस्थित कारकिर्दींत ग्वाल्हेर संस्थानचें उत्पन्न २० लक्षांनीं वाढलें. यावरूनच त्यांची दक्षता व योग्यता दिसून येते.

एकदां असें झालें कीं ग्वाल्हेर संस्थानांतून कांहीं पैसे उकळावे असा हुकूम गव्हर्नर जनरलनें ग्वाल्हेरच्या कावेबाज रेसिडेंटास पाठविला. परंतु ही गोष्ट कळतांच, त्याचा निरोप येण्याचे अगोदरच बाईसाहेबांनीं कंपनी सरकारास अशी विनंती केली कीं, आमची फौज पगार न मिळाल्यामुळें बंड उभारण्याचे विचारांत आहे, तरी दयाळू सार्वभौम सरकारकडून १० लक्ष रुपये कर्जाऊ मिळतील काय? अर्थात इंग्रजसरकारनें पैसे तर दिले नाहींच, पण संस्थानच्या तिजोरींतून जाणारी रकम मात्र वांचली. या एकाच उदाहरणावरून बाईसाहेबांचें चातुर्य व प्रसंगावधान दिसून येतें.

देशपर्यटणः—जनकोजीराव राज्य पहाण्यास योग्य झाल्यावर बाईसाहेबांत व त्यांच्यांत कुजबुज सुरू झाली. यामुळें बाईसाहेब प्रकरण जास्त न वाढवितां धोलपूर, आग्रा, या वरून होत होत काशीस गेल्या. पुढें पेन्शन घेऊन बाईसाहेब नाशिकास जाऊन

राहिल्या. जनकोजीरावांच्या पश्चात जयाजी महाराजांनीं बाईसाहेबांस परत बोलावून आणून उज्जनीस ठेविलें. तेथेंच आपला काळ श्री महांकाळाच्या भजन-पूजनांत घालवून बाईसाहेब इसवी स. १८६३ त निजधामास गेल्या.

धर्मः—तीर्थयात्रा करीत असतांना बाईसाहेबांनीं पुष्कळ क्षेत्रांच्या ठिकाणीं अन्नसत्रें व देवालयें बांधिलीं. त्यांचा त्यांनीं जसा खर्च लाऊन दिला होता त्याप्रमाणेंच ग्वाल्हेर सरकारकडून अजून चालू आहे. यामुळें धार्मिक जगांत त्यांची कीर्ती अजरामर झाली आहे.

स्वभावः—बाईसाहेबांचा पोषाख व रहाणी नेहेमीं साधी असे. दौलतराव महाराजांच्या मरणानंतर बाईसाहेबांनीं उंची वस्त्रें व दागदागिने कधींही वापरले नाहींत. त्यांचे नेमधर्म व देवतार्चन नेहमीं चालत असे; आणि त्या जमीनीवर निजत. बाईसाहेबांचा अंमल कडक होता. मानापमानाकडे त्यांचें विशेष लक्ष असे. परन्तु त्यांचा स्वभाव क्रूर किंवा खुनशी मात्र मुळींच नव्हता.

## दुसरे जनकोजीराव शिंदे ( १८२७ ते १८४३ )

दौलतरावांच्या मृत्यूनंतर बायजाबाईनें मुकुटरावास दत्तक घेऊन त्यांचें नांव श्री. जनकोजीराव ठेविलें; व त्याच वेळीं महाराजांचा विवाह झाला.

जोंपर्यंत महाराज वयांत आले नव्हते, तोंपर्यंत बायजाबाईनीं राज्यकारभार पाहिला. त्या काळीं हल्लींच्या पोपटपंची शिक्षणाची गरजच नव्हती. शौर्य व धडाडी हेच सर्वतोपरी गुण समजले जात. त्या प्रमाणें जनकोजीरावांनीं फौजेच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखी खालीं हे गुण फार लवकर प्राप्त करून घेतले. परंतु 'जग मतलबी आहे.' स्वार्थसाधू लोक घरांत बेकी उत्पन्न करून आपला मतलब साधतात.

ज्या लोकांना जनकोजीरावास शिक्षण देण्याकरितां ठेविलें होतें त्यांनींच आई-लेकरांत वैमनस्य उत्पन्न करून दिलें. जनकोजी महाराज तर ऐन तारुण्याच्या उमेदींत होते. त्यांना बायजाबाईचें म्हणणें पटेना. अखेरीस सैन्य बायजाबाईच्या विरुद्ध बंड करणार अशी अफवा उठली. परंतु बायजाबाईच्या शहाणपणामुळेंच सर्व वावटळ शांत झाली. बायजाबाईंनीं एकदम माघार घेतली. व महाराजांस सर्व कारभार सोंपून देऊन आपण देश पर्यटनास निघून गेल्या.

बायजाबाई देश-पर्यटनास निघून गेल्यानंतर जनकोजीरावांनीं सर्व कारभाराचीं सूत्रें आपले हातीं घेतलीं. कृष्णराव कदम यांना दिवाण नेमण्यांत आलें. त्या वेळीं ठग लोकांनीं मध्य हिंदुस्थानांत फार धुमाकूळ माजविला होता. दहावीस ठग एकत्र होऊन गांवोगांवीं हिंडत; आणि वाटसरूंना भूलथापा देऊन गांवा बाहेर घेऊन जात. तेथें त्यांची एक ठरावीक खूण असे; ती होतांच वाटसरूंच्या गळ्यांभोंवतीं रुमाल घालून ते त्यांस गुदमरून ठार करीत व त्यांचे जवळील द्रव्य घेऊन त्यांना गाडून टाकीत. त्यामुळें प्रजेला भयंकर त्रास होत असे. यामुळें सर्व प्रजा हवालदिल होती. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणें फार कठिण होतें. हजारों माणसांचा बळी ठगांनीं घेतला होता. म्हणून कंपनी सरकारनें त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां शिंदे सरकारची मदत मागितली. जनकोजीरावांनीं लागलीच मदत देऊन प्रजेला या भयंकर त्रासांतून सोडविलें.

जनकोजीरावांच्या कारकिर्दींत विशेष घडामोडी झाल्या नाहींत. सर्वत्र शांतता नांदत होती. नेपाळ व अफगाणिस्तान सारख्या परक्या मुलुखांतून कंपनी सरकारच्या विरुद्ध उठण्यास सांगणारे वकील जनकोजी महाराजांच्या दरबारीं आले होते. परंतु दिलेलें वचन मोडावयाचें नाहीं हें शिंद्यांचें ब्रीदवाक्य. म्हणूनच शिंदे व कंपनी सरकार यांची मैत्री कायम राहिली. जनकोजीराव महारा-

जांचा मृत्यू इ. स. १८४३ त झाला. मृत्यु-समयीं त्यांचें वय केवळ २७ वर्षांचें होतें.

## जयाजीराव शिंदे ( १८४३ ते १८८६ ).

जनकोजीराव मरण पावल्यानंतर ताराबाई ( जनकोजीराव शिंदे यांची पत्नी) यांनीं भगीरथराव नांवाच्या ८ वर्षाच्या मुलास दत्तक घेतलें व त्याचें नांव 'जयाजीराव' ठेवण्यांत आलें.

ई. स. १८४३ चें युद्धः—जयाजीराव वयानें लहान असल्यानें देवराव मामा कदम यांनींच राज्य-कारभार चालवावा असें ठरलें. परंतु दादा खासगीवाले यांना ही गोष्ट पटली नाहीं. ताराबाईही दादा खासगीवाले यांच्या पक्षाची होती. शेवटीं फौज बिथरल्या-मुळें कंपनी सरकारास मध्यस्थी पडून भांडण मिटवावें लागलें. महाराजपूर व पन्यार येथें लढाई होऊन शिंद्यांच्या फौजेचा पूर्ण परा-भव झाला. शेवटीं दोघांचा तह होऊन कौंसिल नेमण्यांत येऊन, ताराबाईस पेन्शन देण्यांत आलें. आजपर्यंत शिंदे स्वतंत्र होते. पण या लढाई मुळें शिंद्यांचें स्वातंत्र्य नाहींसें झालें.

राज्यकारभारः—९ वर्षें पर्यंत कौंसिलनेंच राज्यकारभार पाहिला. इ. स. १८५४ त महाराज वयांत आल्यावर सर्व राज्यकारभार त्यांना सोंपविण्यांत आला. या वेळीं राज्याची स्थिती भयंकर खालावलेली होती. पेशवाई मोडून गेली होती. पण कंपनी सरकारचा अंमल चांगलासा बसला नव्हता. दरबारांत व शिंद्यांच्या कुटुंबांत अनेक भानगडी उत्पन्न होऊन प्रांतांत बेबंदशाही माजली होती. या शिवाय चोराचिलटांचें भय मनस्वी होतें. मक्त्यांच्या मामलतीअसल्यामुळें रय्यत पिळून निघे, तरी सरकारी तिजोरी मात्र रिकामीच असे. या सर्व परिस्थितीचा विचार करून जयाजी महाराजांनीं बेबंदशाहीस आळा घालण्याचा आटो-

काट प्रयत्न केला. त्यांचें शिक्षण जेमतेमच झालें होतें. तरी त्यांची महत्वाकांक्षा जबर होती. या अवघड कामाकरितां त्यांना योग्य माणसाची गरज होती. ती गरज दिनकरराव राजवाडे यांनीं पूर्ण केली. दिनकररावच्या मदतीनें जयाजी महाराजांनीं राज्याची अंतर्व्यवस्था चांगल्या प्रकारें बांधून टाकली. इजारेदारी तोडून प्रत्येक प्रांतावर सरकारी कामगार नेमण्यांत आले. त्या मुळें रय्यत खुष व सुखी झाली. जमीनीची मापणी होऊन सारा ठरविण्यांत आला, शिक्षणाकरितां शाळा स्थापन केल्या व फौजेचाही बंदोबस्त नीट केला. त्या मुळें राज्यांत फारच शांतता नांदून प्रजा महाराजांस दुवा देऊं लागली.

कलकत्त्यास प्रयाण:--इ. स. १८५७ त जयाजीराव कलकत्त्यास लॉर्ड कॅनिंग यांस भेटण्यास गेले. त्या भेटींत त्यांनीं ग्वाल्हेर संस्थानाकरितां बऱ्याच सवलती कबूल करवून घेतल्या.

१८५७ चा रणसंग्राम:—इ. स. १८५७ च्या मे महिन्यांत मीरठ, कानपूर, लखनौ, व दिल्ली येथील इंग्रजांच्या फौजेनें बंडाचें निशाण उभारिलें व कित्येक इंग्रजांना ठार केलें. दुसरे नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, व झांशीची सिंहीण महाराणी लक्ष्मीबाई वगैरे मंडळींनी या संधीचा चांगलाच उपयोग करून घ्यावयाचा असें ठरविलें. बनल्यास स्वराज्य पुनः स्थापन करून कंपनी सरकारला हिंदुस्थानांतून कायमची रजा द्यावयाची हा त्यांचा हेतू होता. पण हा हेतू दुर्दैवानें साध्य झाला नाहीं. झांशी पडल्यावर लक्ष्मीबाई व तात्या टोपे ग्वाल्हेरला आले. बंडवाल्यांनीं शिंदे सरकारला वळविण्याचा बराच प्रयत्न केला. पण तो निष्फळ झाला. श्री जयाजीराव महाराज ह्या वेळीं फितुर झाले असते तर हिंदुस्थानच्या इतिहासांत बरीच क्रांती घडली असती एवढें मात्र खरें. जयाजीराव दिनकरराव राजवाड्यांसह आग्र्यास निघून गेले, मुरारची छावणी लक्ष्मीबाईस सामिल झाली. लक्ष्मीबाईनें ग्वाल्हेर

४२२१



ची छावणी सर केली. ज्या धडाडीनें त्यांनी ग्वाल्हेर सर केलें, तीच धडाडी जर शेवटपर्यंत टिकली असती तर खरोखरच स्वराज्य स्थापन झालें असतें. परंतु ती चिकाटी राहिली नाहीं. सर ह्यू रोजनें ग्वाल्हेर सर केलें. दुर्दैवानें ह्या लढाईंतच महाराणी लक्ष्मीबाई कालवश झाल्या आणि लवकरच सर्वत्र शांतता झाली. जर यावेळीं शिंदे सरकार सामिल झाले असते तर कंपनी सरकारला हिंदुस्थानांतून आपली घोंगडी गुंडाळावी लागली असती, असें इतिहासकार ह्मणतात.

योग्यताः—जयाजीराव शरीरानें भव्य असून त्यांचे डोळे इतके पाणीदार होते कीं, त्यांस पहातांच मनुष्याचे मनावर त्यांच्या राजतेजाचा परिणाम झाल्यावांचून रहात नसे. स्वाभिमान तर त्यांच्यांत फारच बाणलेला होता. १८५७ चे गडबडींत ग्वाल्हेरचा किल्ला इंग्रजांकडे गेला होता. ह्मणून त्यांनीं झांशी शहर देऊन किल्ला परत घेतला. आपल्या राज्यकारभारांत कोणी हात घालणें त्यांना मुळींच आवडत नसे. जयाजीरावांनीं आपला बहुतेक काळ राज्यव्यवस्था सुधारण्याकडे घालविला. एकंदर राज्याचे सर्व भाग सुसंघटित करून, शाळा, दवाखाने वगैरे स्थापून कालोचित बरीच सुधारणा जयाजीरावांनीं केली. बंडांत सामिल झालेल्या लोकांना क्षमा करून पुनः आपल्या जवळ बोलाविलें. जयाजीराव फार धर्मशील होते. त्यांच्या एक लक्ष ब्राह्मण-भोजनाची गोष्ट अजून लोकांच्या तोंडीं आहे. त्याच प्रमाणें जयाजीराव दयाळूही होते. इ. स. १८६८ त दुष्काळ पडला असतांना जयाजीराव स्वतः दुष्काळपीडितांची दशा पहाण्यास गेले व ६ महिन्यांकरितां त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था लावली. राजधानीची शोभा तर जयाजीराव महाराजांनींच वाढविली; व जयेंद्र-भुवन, मोतीमहाल, जलविहार इत्यादि इमारती व जयागंज, जयेन्द्रगंज, नवाबाजार इत्यादि बाजार बांधिले. या इमारती पाहिल्या ह्मणजे शिंदे सरकारचें ऐश्वर्य

दृष्टीस पडतें. जयाजीरावांचे वेळेपासूनच ग्वाल्हेरचे ताबूत व दसऱ्याची स्वारी प्रसिद्धीस आली. केवळ शूरवीरांना व मुत्सद्दी लोकांनाच जयाजीरावांचा दरबार खुला नव्हता. सर दिनकरराव, जगदेवराव माहुरकर, बाबासाहेब जिन्सीवाले, सर माईकिल फीलोज, काशीराव सुर्वे, वगैरे राजनीतिज्ञ मंडळी तर जयाजीरावांच्या कारकिर्दीत प्रसिद्धीस आलीच, पण बाळासाहेब व पन्नासाहेब गुरूजी आणि हद्दूखां व नत्थूखां ही गवई मंडळी, हुसेनखां सतारिया, शंकरराव पंडित, इत्यादि गुणीजनही यावेळींच प्रसिद्धीस आले. कोणताही योग्य मनुष्य जयाजीरावास भेटल्यावर रिकाम्या हातांनीं कधींच परत जात नसे. अव्वल इंग्रजी अमदानींत प्रसिद्धीस आलेल्या देशी राजांत जयाजीरावांची गणना प्रामुख्यानें होते. शिंदे घराण्यांतील सर्व राजांत ते भाग्यशाली होते. जयाजीराव महाराजांचा जन्म जर ५० वर्षें अगोदर झाला असता तर खरोखरीच त्यांचे हातून देशाची फार सेवा घडली असती.

शेवटः—जयाजीरावांना शेवटीं जलोदर रोग झाला होता. अनेक उपाय होऊन देखील कांहीं गुण आला नाहीं. त्यामुळें अतीशय कष्ट होऊन इ. स. १८८६ त जयाजीरावांनीं आपली इहलोकची यशोलीला संपविली. मरण समयीं महाराजांचें वय ५१ वर्षांचें होतें.

## माधवराव शिंदे (१८८६ ते १९२५),

## [ पूर्वार्ध ]

जन्मः—जयाजीरावांचे चार विवाह झाले होते. परंतु त्यांना मुलगा मात्र चवथ्या बायको पासूनच झाला. त्यांचें चवथें लग्न कृष्णराव जाधव यांची मुलगी सख्याराजा यांच्याशीं झालें होतें. माधवरावांचा जन्म ताः २१ आक्टोबर १८७६ रोजीं झाला. म्हानारपणीं

पुत्ररत्न प्राप्त झाल्यानें जयाजीरावांस फार आनंद झाला. महादजी शिंद्यांपासून एकही औरस पुरुष गादीवर बसला नव्हता. सगळे दत्तकच होते. परंतु आपली गादी चालवणारा औरसपुत्र आहे हें पाहून जयाजीरावांस फार धन्य धन्य वाटलें.

पितृवियोगः—जयाजीरावांनीं बाळ माधवास लहान वयांतच राज्योपयोगी शिक्षण देण्याचें ठरविलें होतें. परंतु १८८६ तच जयाजी राव मरण पावल्यानें त्यांचे सर्व हेतू मनांतच राहिले. त्यांच्या मरणा नंतर माधवरावांना राज्याभिषेक झाला व कौन्सिल ऑफ रिजेन्सी नेमण्यांत आलें. त्याचे प्रेसीडेन्ट सर गणपतराव खटके होते. खट- क्यांनंतर प्रेसीडेन्टची जागा कृष्णराव जाधव यांस मिळाली.

शिक्षणः-माधवरावांना बालपणींच पितृ-वियोग सहन करावा लागला. पण त्यांनीं या गोष्टीपासून उत्तम धडा घेतला. दुसऱ्यावर विसंबून न राहतां, त्यांनीं स्वावलंबनाचा स्वीकार केला व थोड्याच दिवसांत आपली सर्वांगीण उन्नती करून सर्वांस चकित करून सोडलें. पं. आनंदीलाल, पं. प्राणकृष्ण, श्रीयुत गोपाळ मोरेश्वर गुरूजी, पं. धर्मनारायण, श्रीयुत रामराव गोपाळ व जनरल क्राफ्ट्स इत्यादी योग्य शिक्षकाच्या सच्चारित्राचा माधवरावांवर बराच प्रभाव पडला; आणि दिवसेंदिवस त्यांची ज्ञान-लालसा व ज्ञान-भंडार हीं वाढूं लागलीं.

माधवरावांचें प्राथमिक शिक्षण संपतांच उच्च शिक्षण देण्यां- करितां इंदूर येथील डेली कॉलेजचे प्रिन्सीपॉल मि. जे. डब्ल्यू. डी. जान्स्टन यांना बोलाविलें. माधवरावांना वैज्ञानिक शिक्षण तर मि- ळतच असे. पण त्या बरोबरच कित्येक विषयांचें व्यावहारिक ज्ञान ही मिळूं लागलें. त्यांची बुद्धी इतकी तीव्र होती कीं, ते कठिण कठिण प्रश्नांना सहज सोडवीत. यामुळें त्यांच्या शिक्षकांना फार कौतुक वाटे.

मानसिक उन्नती प्रमाणेंच माधवरावांच्या शारीरिक उन्नती-कडेही कौन्सिलचें फार लक्ष होतें. कर्नल उल्फतसिंह, जनरल अब्दु-लगनी, भैय्यासाहेब आपटे, मामासाहेब भोंसले, निंबाळकर, वगैरे सैनिकांचे देखरेखीखालीं माधवराव लष्करी कामांतही फार तरबेज झाले. घोडयावर बसणें, नेम मारणें, शिकार खेळणें, सैन्याला बरोबर घेऊन जंगलांतून हिंडणें, इत्यादि गोष्टींचा त्यांना अतिशय नाद होता.

शिक्षण पूर्ण केल्यानंतर माधवरावांनीं दिवाणी, फौजदारी, माल व लष्करी खात्यांत एकाद्या यःकश्चित् कारकुनापासून मोठ-मोठ्या अधिकाऱ्यापर्यंतचें काम स्वतः यशस्वी रीतीनें पार पाडलें.

राज्यकारभारः—अशा रितीनें महाराजांची बुद्धी, योग्यता व कार्यकुशलता पाहून ता. १५ डिसेंबर १८९४ रोजीं माधवरावांस पूर्ण अधिकार देण्यांत आले. अधिकार मिळाल्यावर माधवरावांनीं चालू राज्यपद्धती पहाण्याकरितां व अधिकारी वर्गाशीं परिचित होण्याकरितां कित्येक वर्षेंपर्यंत राज्यांत दौरा केला; संस्थानाची अंतःस्थ स्थिती पाहून झाल्यावर कायद्याचें संशोधन केलें.

प्रत्येक खात्यांत माधवरावांनीं कितीतरी सुधारणा केल्या. त्या सर्व लिहीत बसल्यास स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. पण थोड-क्यांत सांगावयाचें म्हणजे त्यांच्या सुधारणांचा असा परिणाम झाला कीं, ग्वाल्हेर संस्थानांतील प्रत्येक खातें व उपखातें हल्लींच्या काळीं सुधारलेल्या इंग्रज सरकारच्या खात्यांची व त्यांतून काम होणाऱ्या पद्धतीची सहज बरोबरी करूं शकेल. शेवटीं माधवरावांनीं श्री छत्र-पती शिवाजी महाराजांच्या अष्ट-प्रधान-मंडळाप्रमाणें राज्यव्यवस्था पहाण्याकरितां १० मेंबर्स कायम केलेत. तेच हल्लीं राज्य कारभार पहात आहेत. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

१ पोलीटिकल मेंबर. २ आर्मी मेंबर. ३ होम मेंबर. ४ रेव्हेन्यू

मेंबर. ५ मेंबर फॉर लॉ एन्ड जस्टीस. ६ फायनेन्स मेंबर. ७ मेंबर फॉर एग्रीकल्चर. ८ मेंबर फॉर अपील्स. ९ मेंबर फॉर ट्रेड, कस्टम्स एन्ड एक्साइज. १० मेंबर फॉर एज्युकेशन एन्ड म्युनिसीपॅलिटीज.

## [ उत्तरार्ध ]

श्रीमंत माधवरावांचे दोन विवाह झाले होते. पहिला विवाह माधवराव मोहिते यांची कन्या श्री. चिनकूराजा यांच्याशीं इ. स. १८९० त झाला; आणि दुसरा विवाह सांकळी येथील राणे यांची कन्या गजराराजा यांच्याशीं इ. स. १९१३ त झाला.

माधव महाराजांच्या दुसऱ्या विवाहाच्या यशाचीं चिन्हें लौकरच दिसून आलीं. इ. स. १९१४ त कमलाराजा व पुढें १९१६ त २६ जून रोजीं जिवाजीराव महाराजांनीं मातोश्री गजराराजा यांच्या उदरीं जन्म घेतला. ह्या आनंदाच्या भरांत संस्थानांत कितीतरी महोत्सव झाले.

पण राजा असो वा रंक असो, नेहमींच सुख लाभणें फार कठीण. इ. स. १९१९ त श्री जीजा महाराज या असार संसारास सोडून गेल्या. यांची छत्री शिवपुरी येथें बांधली आहे. अलीकडे माधव महाराज दिवसांतून १८।२० तास काम करीत असत. यामुळें त्यांचें आरोग्य नष्ट होत जाऊन मनाची अस्वस्थता वाढत चालली होती. इ. स. १९२४, १९२५ त ग्वाल्हेरची कर्तीं माणसें एकामागून एक काळाच्या कराळ दाढेंत गडप झालीं. बळवंतराव भैया शिंदे, सर माईकिल फीलोज, कर्नल उल्फतसिंह, श्री. मन्नूराजा शितोळे, इत्यादि मंडळी कैलासवासी झाली. त्यामुळें माधव महाराजांचे मनाचाही अस्वस्थपणा आणखीच जोरावला.

मृत्यु:—या करितां राज्य-कारभारा पासून दोन महिन्यांची सुट्टी घेऊन, डॉक्टरांच्या सल्लेनुरूप हवा पालटण्याकरितां म्हणून

ता. १० एप्रिल १९२५ रोजीं माधव महाराज युरोपला जाण्यास निघाले. त्यावेळीं त्यांचे मानेवर एक फोड झाला होता. प्रवासा प्रमाणेंच फोडाचीही दुखापत वाढूं लागली; आणि शेवटीं पहिल्या कार्यक्रमाप्रमाणें महाराज ५ जून रोजीं लंडनहून परत निघणार होते. परंतु, त्या दिवशींच महाराजांनीं आपला इहलोकचा प्रवास संपविला.

योग्यता:—लढाई मारण्याचा हा काळ नसला तरी माणसाचे शौर्य-वीर्यादि गुण कधींच लपून रहात नाहींत. श्रीमंत माधवराव महाराज हल्लींच्या सम्राटांबरोबर ( त्या वेळचे प्रिंस ऑफ वेल्स ) शिकार खेळण्यास गेले होते. दैववशात् असा प्रसंग आला कीं, वाघ महाराजांवरच उलटला. प्रसंगावधान न सोडतां महाराजांनीं त्यावर नेम धरून अशी गोळी झाडली कीं, वाघ तत्क्षणींच खालीं पडला. महाराजांची कल्पनाशक्तिही विलक्षण होती. जीजा महाराजांच्या मरणानंतर तसल्या दुःखांतही मातोश्रींच्या छत्रीकरितां अशी जागा शोधून काढली कीं, त्यांच्या अचाट कल्पनाशक्ती बद्दल आश्चर्य वाटतें. त्यांची कल्पनाशक्ति इतकी विलक्षण असल्यामुळेंच त्यांना लहान-सहान कामें आवडत नसत. पार्वती स्कीम प्रमाणें त्यांचीं कामें अजस्त्र प्रमाणावर चालत.

कर्तव्य-भ्रष्ट माणसाला महाराजांच्या मनांत मुळींच जागा सांपडत नसे. तसेंच महाराज दयाळूही होते. प्रसंगाला साजेसें वर्तन तर महाराजांच्या अंगवळणींच पडलें होतें. महाराजांचें व्यक्तित्व फार जबरदस्त असे. प्रजावात्सल्य व भूतदया महाराजांत विशिष्ट रूपानें वास करत. आत्मिक बळ तर महाराजांच्या प्रत्येक आचरणांत निदर्शनास येत असे.

"बोले तैसा चाले" हें सुभाषित म्हणजेच महाराजांचा जीवनक्रम. रय्यतीचे मालक असूनही महाराज प्रजेसच स्वतःचा

अन्नदाता समजत असत. महाराजांच्या राज्यांत सर्व धर्मांचे, सव जातींचे व भिन्न भिन्न भाषा बोलणारे लोक रहात आहेत. तरी एका विशिष्ट जाती बद्दल किंवा धर्माबद्दल त्यांना अभिमान नव्हता. महाराज सर्वांना सारखें वागवीत. हिंदूंचा गणपती-उत्सव जितक्या थाटमाटानें होत असे तितक्याच थाटानें ताबूताचा समारंभही पार पडे. महाराजांना पोशाखी डामडौल मुळींच आवडत नसे. पुस्तकी ज्ञानापेक्षां महाराजांना व्यावहारिक ज्ञान पसंत पडे. स्वाभिमान् तर महाराजांत पूर्ण बाणलेला होता. त्याचप्रमाणें महाराज साहसीही होते. परमेश्वरावर भरंवसा ठेऊन महाराज रात्रंदिवस प्रजेच्या सुखाकरितां झटत असत, आणि प्रजेचें सुख तेंच आपले सुख समजत असत. त्यांच्या कारकिर्दीची थोडक्यांत मीमांसा करावयाची झाल्यास, एकोणीसाव्या शतकांत जडलेलें शैथिल्य झुगारून देऊन महाराजांनीं ग्वाल्हेर संस्थानास हिंदवी स्वराज्यांत पहिल्या प्रतीची जागा मिळवून दिली, अशी करितां येईल.

भुवन-निर्माणः—माधवराव शिंदे ह्मणजे शिंदे घराण्यांतील प्रती शहाजहानच. महाराजांनीं प्रजेच्या मनोरंजनार्थ पुष्कळ इमारती बांधल्या. त्यामुळें त्यांची कीर्ती चिरकाल राहील. त्या इमारती पैकीं श्री. जीजामहाराज यांची शिवपुरी येथील छत्री व 'सख्यासागर' हें पाहिलें ह्मणजे महाराजांची निस्सीम मातृभक्ती व शिल्पशास्त्रज्ञता यांची यथार्थ जाणीव होते. ही छत्री हिंदुस्थानांतील रम्य व प्रेक्षणीय स्थळांपैकीं एक आहे. आग्रा येथील ताजमहाल प्रमाणें ही चिरकालपर्यंत बांधणाराची व जिच्या स्मरणार्थ बांधिली आहे तिची कीर्ती कायम ठेवील. त्या छत्रींत एक विशेष आहे तो हा कीं, पत्नी-प्रेमाच्या स्मरणार्थ शहाजहानानें ताजमहाल बांधला. पण पूज्य मातृप्रेमाच्या स्मरणार्थ ही छत्री बांधली आहे. पत्नीच्या प्रेमाची स्मारकें इतिहासांत कितीतरी सांपडतील, पण उच्चतर

मातृप्रेमानें बांधलेलें स्मारक या भरतखंडाच्या इतिहासांत हें पहिलेंच आहे.

## श्रीमंत सरकार जिवाजीराव शिंदे

( १९२५ पासून )

श्रीमंत माधवमहाराज मरण पावल्यानंतर ता: ८ ऑक्टोबर १९२५ रोजीं श्रीमंत जिवाजीराव महाराज शिंदे यांस राज्याभिषेक झाला. महाराज वयांत येईपर्यंत राज्य-कारभार चालविण्या करितां एक " कौन्सिल ऑफ रीजन्सी " नेमण्यांत आलें आहे.

कौन्सिल प्रेसीडेन्ट—श्री. मातोश्री चिनकूराजा शिंदे.

व्हाइस प्रेसीडेन्ट—सरदार आपाजीराव साहेब शितोळे, अंकलीकर, के. बी. इ., सी. आय ई.

मेंबर्स—सरदार साहेबजादा सुलतान महमदखां, रावजी जनार्दन भिडे, राय बहादुर गजपतराय, कलासनारायण हक्सर, अब्दुल करीम खां, सरदार गणपत रघुनाथ राजवाडे, श्री. खासे साहेब पवार, रावसाहेब लक्ष्मण भास्कर मुळे, आणि रावबहादुर बापूराव पवार.

वेळ फार जलद जातो. कौन्सिलचा कारभार सुरू होऊन उणी-अधिक ५ वर्षें होऊन गेलीं. या काळांत बऱ्याच घडामोडी झाल्या असल्या तरी एकंदर राज्यकारभाराची रचना व पद्धत कै. माधवराव शिंदे यांनीं घालून दिल्या प्रमाणेंच चालू आहे.

शिक्षण:—शिंदे-घराणें म्हणजे तलवार-बहाद्दराचें. महादजी शिंदे 'कलमबहाद्दर' जरी नसले, तरी 'समशेरबहाद्दर' होते. समशेरीच्या जोरावर त्यांनीं सर्व हिंदुस्थान हलवून सोडलें होतें. हा अभिमान जागृत होऊनच कीं काय. कै. माधव महाराजांनीं १९२० पासूनच—म्हणजे हल्लींचे महाराज ४ वर्षांचे असतांनाच—एक

रुपया पगारावर श्री. जिवाजीमहाराजांची सैन्यांत साधारण शिपाई ह्मणून नेमणूक केली. तेव्हां पासून शिस्तींत शिक्षण मिळत गेल्या मुळें महाराजांची बुद्धी तीव्र व जिज्ञासू झाली आहे. कोणताही विषय असो तो महाराजांना फार लौकर समजतो.

कुमार जयसिंह (मकसूदनगढ), कुमार महेन्द्रसिंह (आगरा-वरखेडा) आणि डी. एच. आपटे हे महाराजांचे सहाध्यायी आहेत. हे तिघे व स्वतः महाराज अशा चौघांची एक नियमित शाळाच भरते तेव्हां सर्व विषय शिकविले जातात.

खंडकर, बावकर, हकदादखां, मेंहदळे, नाफडे व दौलतसिंह, गफ्फारखां ही श्री जिवाजीराव महाराजांची शिक्षकमंडळी होत. शिक्षकवर्ग विद्वान, बहुश्रुत व आपापल्या विषयांत निपुण आहे.

दिनचर्या बांधलेली असल्यामुळें महाराजांना कामाचा कंटाळा मुळींच येत नाहीं. महाराज मैदानी व मर्दानी खेळांतही तसेच निपुण आहेत. घोड्यावर बसणें, हाकी खेळणें, कवाइत करणें इत्यादि त्यांच्या आवडीचीं कामें होत. श्री. कमलाराजा यांच्या शिक्षणाचीही अशीच व्यवस्था झाली आहे

आकांक्षाः—शिक्षण संपवून मनुष्यानें जगांत पाऊल टाकलें ह्मणजे कर्तव्याची जबाबदारी त्याच्या डोक्यावर येऊन पडते. शिक्षण संपेपर्यंत तो बेफिकिर असतो; आणि ती जबाबदारी पूर्ण-पणें पार पाडण्याकरितांच शिक्षणाची आवश्यकता असते. महा-राजांचें शिक्षण व त्याबरोबरच त्यांची प्रगती संतोषकारक आहे. संपूर्ण अधिकार मिळाल्यानंतर पुढें येणाऱ्या जबाबदारीचा भार वाहून नेण्याकरितां ते समर्थ होतील हेंही पण निर्विवाद आहे. परंतु तेहतीस लक्ष प्रजेची आकांक्षा तृप्त करावयाची असेल तर महाराजांनीं आपल्या कुळाची, शीलाची, राज्याची, प्रजेची व देशाची लाज, "बापोंसे बढकर कछु" राखिली पाहिजे.

# परिशिष्ट

## —अ—

### ग्वाल्हेर संस्थानचें भौगोलिक वर्णन.

ग्वाल्हेर हें फार जुनें शहर आहे. पौराणिक काळापासून येथील किल्ला फार मजबूत व अजिंक्य समजला जात असे. दिल्लीहून दक्षिणेस जाणाऱ्या वाटेवर हा किल्ला असल्यामुळें मुसलमानी अमदानींत यास बरेंच महत्व आलें होतें. याच कारणामुळें श्री. दौलतराव शिंद्यांनीं उत्तर हिंदुस्थानांतील आपल्या सैन्याचा तळ 'ग्वाल्हेर' नजीकच्या मैदानांत ठेवला; आणि तेथेंच हळूहळू हल्लींचें 'लश्कर' शहर उदयास आलें. यामुळेंच शिंद्यांचे राज्यास 'ग्वाल्हेर' संस्थान ह्मणतात.

हें संस्थान दोन भागांत विभागलेलें आहे. उत्तरेकडील विभागास ग्वाल्हेर आणि ईसागढ प्रांत असें म्हणतात, तर दक्षिणेकडील भागास माळवा प्रांत म्हणतात. ग्वाल्हेर आणि ईसागढ प्रांतांतील प्रदेश एकमेकास लागून आहे, तर माळव्यांतील तुटक तुटक आहे.

उत्तरेकडे चंबल नदी, धोलपुर, करोली व जयपुर हीं संस्थानें, पूर्वेकडे संयुक्त-प्रांतांतील इटावा, जालवण, झांशी, ललितपुर व मध्य-प्रांतांतील सागर हे जिल्हे, दक्षिणेकडे भोपाळ, इंदोर, धार, देवास हीं संस्थानें व नर्मदानदी आणि पश्चिमेकडे इंदोर, झाबुआ, रतलाम, उदयपुर आणि प्रतापगढ हीं संस्थानें आहेत.

ग्वाल्हेर संस्थानचें क्षेत्रफळ २६३८३ वर्ग मैल असून लोकसंख्या जवळ जवळ ३२ लक्ष आहे; आणि उत्पन्न दोन कोटींचे व[illegible] आहे.

या संस्थानांत सर्व वर्णांचे, सर्व जातींचे, सर्व धर्मांचे व सर्व पंथाचे लोक रहातात.

नैसर्गिक दृष्ट्या गिर्द, भिण्ड, तवरघार, शोपूर हे जिल्हे सखल आहेत. नरवर, ईसागढ भेलसा, उज्जेन, मंदोसर व शाजापुर हे जिल्हे उंचवट्याचे आहेत. अमझरा जिल्हा मात्र पर्वतांनीं व्यापिलेला आहे.

ग्वाल्हेर संस्थानांतून वहाणाऱ्या बऱ्याच नद्या आहेत. त्यां पैकीं मुख्य ह्मणजे, चंबल, वेत्रवती, काळी सिंध, क्षिप्रा, पार्वती, सांक, आसन, बनास ह्या होत. कित्येक नद्यांचा उपयोग तर पाट बांधण्याकडेही केला आहे.

उत्तरेकडील सखल जिल्ह्यांत हिंवाळा व उन्हाळा फार कडक असतो. माळव्यांत हवामान समशीतोष्ण असून पावसाचें प्रमाण ३९ इंच आहे. उत्तरे कडील प्रांतांत पावसाचें प्रमाण ३२ इंच आहे.

संस्थानचें मुख्य उत्पन्न शेतीवर अवलंबून आहे. ज्वार, बाजरा मक्का, तांदुळ, उडीद, गहूं, चणे, कांपूस, अफू यांचें उत्पन्न बरेंच आहे. खनिज पदार्थांत दगड, लोखंड, मीठ, सोडा, गेरू इत्यादि पदार्थही उत्पन्न होतात. जंगलांतील उत्पन्नापैकीं लाख, गोंद, इमारती लांकूड, काथ इत्यादि वस्तु प्रमुख होत.

संस्थानांतून प्रत्येक वर्षीं जवळ जवळ २॥ कोटींच्या मालाची आयात व ३॥ कोटींची निर्यात होते. 'आयात' मालापैकीं, तांदूळ, गूळ, साखर, रॉकेल, तेल, फळ-फळावळ, लोखंडी सामान, सुती, ऊनी व रेशमी कापड, औषधें, तम्बाखू, रंग, दारू, मीठ इत्यादि होत.

ज्वार, बाजरा, मूग, गहूं, तीळ, अळशी, कापूस, दगड, काथ, चामडें, लाख, गोंद वगैरे 'निर्यात' माल होय.

ग्वाल्हेर संस्थानांतून एकंदर लहान मोठे मिळून ४२ कारखाने आहेत. वर्कशॉप, प्रिंटिंग प्रेस, लेदर फॅक्टरी, जिनिंग मिल्स, स्पिनिंग व वीव्हिंग मिल्स, ऑइल मिल्स इत्यादि यापैकीं प्रमुख होत.

बाग येथील बौद्ध धर्मीय गुफा, सांची येथील स्तूप, उज्जैनचा कालियादेह पॅलेस, श्री महांकालेश्वराचें देवालय, या शिवाय मंदोसर, उज्जैन, व चंदेरी, ग्वाल्हेर येथील मुसलमानांच्या वेळचें शिल्प शास्त्रीय काम वाखाणण्यासारखें आहे. शिवपुरी येथील छत्री ही तर आधुनिक स्थलांपैकीं फार प्रेक्षणीय आहे. हिंदुस्थानांत असलें रमणीय स्थान क्वचितच सांपडेल.

राज्य-व्यवस्थेकरितां संस्थानाची ११ जिल्ह्यांत व ३७ परगण्यांत विभागणी केली आहे:—

जिल्हा. परगणे.

१ गिर्द :—गिर्द, पिछोर, मस्तूरा, भांडेर.

२ भिंड :—भिंड, महगांव, लहार, गोहद.

३ तवरघार :—अम्बाह, जोरा, नूराबाद, सबलगढ.

४ शोपुर :—शोपुर, बिजेपुर.

५ नरवर :—शिवपुरी, करेरा, पिछोर, कोलारस.

६ ईसागढ :—बजरंगढ, पछार, मुगावली, कुंभराज.

७ भेलसा :—भेलसा, बासोदा.

८ उज्जेन :—उज्जेन, बडनगर, खाचरोद, सोनकछ.

९ मंदोसर :—मंदोसर, जावद, नीमच, गंगापुर, सुवासरा

१० शाजापुर :—शाजापुर, शुजालपुर.

११ अमझरा :—अमझरा, बाकानेर.

# परिशिष्ट

## —ब—

## कौन्सिल ऑफ रीजन्सीची साधारण माहिती.

### प्रेसीडेन्ट.

### श्रीमंत चिनकूराजा शिंदे, सी. आई.

मागें सांगितल्याप्रमाणें श्री. चिनकूराजा इतिहास-प्रसिद्ध मोहिते घराण्यांतील कन्या होत यांचा जन्म १८८० व विवाह १८९१त झाला यांची कर्तव्य-तत्परता व आज्ञाधारकपणा पाहून श्री. जीजा-महाराज यांच्यावर मुलीप्रमाणें प्रेम करीत. यांना मराठी, संस्कृत, उर्दू, हिंदी, फार्शी व इंग्रेजी इतक्या भाषा येतात. या शिवाय चित्र-कला, विणकाम व गायन यांना चांगलें अवगत आहे. श्री माधव-महाराजांना तर यांचे बद्दल फार अभिमान वाटत असे. महाराजांच्या कारकिर्दींतसुद्धा यांनीं तीन वेळां संस्थानचें काम चालविलेंलें आहे. यामुळें त्यांच्या अंगांत काम करण्याची धमक व चतुरस्रता पूर्णपणें बाणली आहे.

पतीचें मरण ह्मणजे स्त्रीच्या सर्वस्वाचा नाशच होय. पण अशा दुःखमय परिस्थितींतही त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव पूर्णपणें आहे, असेंच ह्मणावे लागेल. कारण कै. माधवमहाराजांच्या काळा-प्रमाणेंच सद्यांही राज्यव्यवस्था सुरळित चालली आहे. श्री. माधवमहाराजांची आठवण निदान या बाबतींत तरी मुळींच होत नाहीं. या खेरीज श्री. जिवाजी महाराजांच्या शिक्षणाची व्यवस्था व शिस्त पाहिली ह्मणजे त्यांच्या दूरदर्शित्वाचें आश्चर्य वाटतें; आणि या पुढें हा बाल-रवी खरोखर भूमंडळांत चमकणार आहे, अशी मनाची खात्री पटते.

## व्हाइस प्रेसीडेन्ट.

### ले. क. अमीरुल उमरा सरदार सर आपाजीराव शितोळे,

अंकलीकर के. बी. ई., सी. आय. ई.

हें घराणें मेवाडांतील शिसोदिया वंशापैकीं दक्षिणेंत गेलेल्या शाखेपैकीं होय. यांचे पूर्वज श्री. थोरले माधवराव पेशवे यांचे कारकिर्दीत बरेच प्रसिद्धीस आले. त्या वेळेपासून हे अंकली येथील जहागीरदार झाले. सर आपाजीराव साहेब शितोळे यांचा जन्म १८७४ त झाला. यांचा विवाह माधवराव महाराजांच्या भगिनी कै. मन्नूराजा यांच्याशीं झाला होता आणि त्या वेळेपासूनच हे ग्वाल्हेर-दरबारचे सरदार झाले.

प्रथम प्रायवेट सेक्रेटरी, नंतर ज्युडीशियल कौन्सिलचे मेंबर तेथून बऱ्याच ठिकाणीं काम करून शेवटीं माधवमहाराजांनीं यांना रेव्हेन्यू मेंबरची जागा दिली व पुढें हे कौन्सिलचे व्हाइस प्रेसीडेन्ट झाले.

यांना सामाजिक कार्यांत भाग घेण्याची बरीच हौस आहे. कितीतरी लोकसंस्था त्यांनीं स्थापन केल्या आहेत. मराठ्यांच्या शिक्षणाविषयीं त्यांना विशेष कळकळ आहे. त्यांचा स्वभाव दयाळू आहे. त्यामुळें सर्वांना त्यांचे विषयीं आपलेपणा वाटतो.

## मेम्बर्स.

### सरदार साहेबजादा सुल्तान एहमद खां,

सी. आय. ई., एम्. ए. एल. एल बी. बॅरिस्टर-एट-लॉ.

स्वर्गीय माधवमहाराजांच्या बाळपणीं नेमिलेल्या 'कौन्सिल ऑफ रीजन्सी' चे सुल्तान गुलाम एहमदखां ह्मणून एक मेंबर होते, त्यांचे हे चिरंजीव. विद्वान् पदवीधर असल्यामुळें स्वर्गीय महा-

राजांनीं त्यांना आपल्या येथें आश्रयास ठेऊन घेतलें. यांनीं सर्व खात्यांचें नीट नियंत्रण केलें आहे. ज्युडीशीयल, फायनेन्स, आर्मी, वगैरे खात्यांत यांनीं काम केलें आहे. या शिवाय नाभा दरबार व ब्रिटिश सरकार यांत तडजोड घडवून आणण्यांत यांनीं फारच सुरेख कामगिरी केली आहे. याचप्रमाणें सावंतवाडी प्रकरणाचाही यांनींच निकाल लावला. यावेळीं हे पोलीटिकल मेंबरचें काम करीत आहेत. ग्वाल्हेर येथील प्रमुख लोकांत यांची गणना असल्यामुळें 'राउंड टेबल कॉन्फरन्स' करतां त्यांस बोलावणें आलें आहे.

## रावबहादुर रावजी जनार्दन भिडे, बी. ए.

पुणें येथील प्रसिद्ध सावकार अंताजी नाइक भिडे यांचे हे वंशज होत. बी. ए. झाल्यानंतर यांना २ वर्षेपर्यंत दक्षिणा-फेलोशिप मिळाली. हे प्रथम इंदोर येथें नोकरींत शिरले. तेथून देवासला गेले व नंतर ग्वाल्हेरला १९०८ मध्यें आले. पोलीटिकल, रेव्हेन्यू वगैरे खात्यांत काम केल्यानंतर स्वर्गीय महाराजांनीं यांना फायनेन्स-मेंबर नेमलें. खर्चांत काटकसर कशी करावयाची हें भिडे यांना पूर्णपणें माहीत होतें. ह्यामुळें हे महाराजांच्या विश्वासास पात्र झाले होते.

इतकेंच नव्हे, तर स्वर्गीय महाराज त्यांना "गुरूजी" म्हणून संबोधीत असत आणि ह्या मानाला ते योग्यही आहेत. सन् १९३० मध्यें ते येथून गेले व त्यांचे जागीं मु. जयगोपाल अष्ठाना ह्यांची नेमणूक झाली.

## रायबहादुर गजपतराय, मुंतजिम बहादुर.

साधारण कारकुनापासून सुरवात करून कौन्सिलचा मेंबर होण्याच्या कर्तबगारीचें भाग्य मुन्शीजींस लाभलें आहे. बहुतेक सर्व खात्यांत कोणत्या ना कोणत्या जागेवर काम केल्यानंतर स्वर्गीय

महाराजांनीं 'ट्रेड, कस्टम एन्ड एक्साइज' हें खातें मुन्शीजींच्या स्वाधीन केलें. फार शिक्षण झालेलें नसतांही आपल्या अक्कल-हुशारीनें मुन्शीजींनीं या खात्याची इतकी सुधारणा करून दाखविली कीं, या खात्याचें उत्पन्न पांच पट वाढलें.

लहानशा नाकेदारापासून तों मोठ्या हुद्द्याच्या अधिकाऱ्या पर्यंत सर्वांची कामें रेखींव करून दिलीं, त्यामुळें या खात्यांत मुन्शीजींची स्मृती अजरामर राहणार आहे. अलीकडे त्यांची प्रकृती बरोबर रहात नसल्यानें त्यांनीं पेन्शन घेतलें आहे; आणि त्यांचे जागेवर मेजर हश्मतुल्लाखां यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

ले. क. **कैलाश नारायण हक्सर,** बी. ए., सी. आय. ई.

हे अतीशय बुद्धीमान व विलक्षण हुशार आहेत. ग्वाल्हेरला शिक्षण संपविल्यानंतर स्वर्गीय महाराजांचे प्रायवेट सेक्रेटरी व नंतर पोलिटिकल मेंबर अशा यांच्या चढत्या पायऱ्या आहेत. यांची तडजोड घडवून आणण्याची पद्धत पाहून 'नरेन्द्र मंडळा' नें यांना ग्वाल्हेर दरबार कडून मागून घेतलें आहे. हेही राउन्ड टेबल कान्फरन्सला जाणार आहेत. नरेंद्र-मंडळाकडे कर्नल हक्सर निघून गेल्यापासून पोलीटिकल मेंबरचें काम सरदार, साहेबजादा सुल्तान एहमदखां पहात आहेत. स्वर्गीय माधवमहाराजांच्या खास माणसा-पैकीं कर्नल हक्सर हे होत. अशीं हुशार माणसें संस्थानिकांच्या आश्रयाला असणें अगदीं आवश्यक व भूषणावह आहे.

**अब्दुल करीमखां,** एम. ए., बार. एट. लॉ.

हे जावरा येथील रहिवाशी. फर्स्टक्लास बी. ए. व फर्स्टक्लास एम. ए. झाल्यानंतर हे सरकारी पैशानें बॅरिस्टर होऊन आले. कांहीं दिवस अलीगढ येथें लॉ प्रोफेसरचें काम केल्यानंतर यांनीं ग्वाल्हेर दरबारची नोकरी पत्करली. तेव्हां पासून लॉ-मेंबर पर्यंत वाढले. यांचें कायद्यांचें ज्ञान गहन असून यांचें नैतिक जीवनही फार उच्च दर्जाचें आहे.

## मेजर जनरल सरदार गणपतराव रघुनाथ राजवाडे, सी. बी. ई.

हे सर दिनकरराव राजवाडे यांचे नातू होत. ग्वाल्हेरला शिक्षण संपवून यांनीं सेटलमेन्ट डिपार्टमेन्टचें काम शिकण्यास सुरवात केली. तेथें आपल्या हुशारीनें व कर्तबगारीनें ते वाढत जाऊन शेवटीं आर्मी मेंबर नेमण्यांत आले. सैन्याच्या कामांत राजवाडे फार हुशार आहेत. त्यांची रहाण्याची पद्धत, शिस्त व विचार अगदीं आधुनिक आहेत. त्या मुळें शिकलेल्या तरुणांची वृत्ती सैनिक होण्याकडे धाव घेऊं लागली आहे.

## श्री. खासे साहेब पवार.

हे देवास जूनीयर येथील महाराजांचे धाकटे बंधू होत. यांचें शिक्षण अजमेर येथें झालें असून इतिहास हा यांचा आवडता विषय आहे. बॅरिस्टर होण्याकरितां खासे साहेब दोन वेळां विलायतेस गेले, पण कांहीं घरू अडचणीमुळें दोन्ही वेळां त्यांना परिक्षेच्या अगोदरच परत यावें लागलें. कांहीं दिवस हे देवास पाती २ येथें दिवाण होते. इ. स. १९१९त स्वर्गीय महाराजांनीं यांना आणून होम मेंबर नेमिलें. खासेसाहेबांच्या कारकिर्दीत ग्वाल्हेर संस्थानांतील जहागीरदार वर्गांत बरीच सुधारणा घडून आली आहे. मराठ्यांविषयीं तर खासे साहेबांना विशेष कळकळ आहे.

## रावसाहेब लक्ष्मण भास्कर मुळे, बी. ए.

मुन्शी गजपतराय प्रमाणेंच रावसाहेब मुळ्यांनीं देखील आपल्या कर्तबगारीच्या जोरावर मेंबरची जागा मिळविली. ग्वाल्हेर येथून फर्स्टक्लास बी. ए. झाल्यानंतर त्यांना हायकोर्ट मध्यें साधारण कारकुनाची जागा पत्करावी लागली. पण जबर महत्वाकांक्षा व कर्तव्य-तत्परता अंगीं असली ह्मणजे माणूस कसा वाढतो हें मुळ्यांनीं

सिद्धकरून दाखविलें. आज ते मेंबर फॉर एज्यूकेशन एन्ड म्युनीसीपालीटीज ही उच्च जागा सुखानें उपभोगीत आहेत हें त्याचें फल आहे.

रेव्हेन्यू खात्याचा त्यांचा अनुभव तर आश्चर्यजनकच आहे. रावसाहेब एज्यूकेशन मेंबर झाल्यापासून या खात्याची विद्युत्गतीनें सुधारणा होत आहे. यांचा स्वभाव शांत व मनमिळाऊ असल्यामुळें सर्वांना त्यांचे विषयी आदर वाटतो कर्नल हक्सर व रावसाहेब मुळे ही जोडी ह्मणजे ग्वाल्हेरला खरोखरीच आदर्शनीय आहे.

## कॅप्टन रावबहादुर बापूराव पवार.

सर्विस स्कूल मध्यें शिक्षण घेतल्या नंतर यांनीं नायब तहसीलदारी पासून नोकरीस सुरवात केली. हळूहळूं आपल्या आंगच्या गुणांवर वाढत जाऊन स्वर्गीय महाराजांनीं त्यांना एग्रिकल्चर मेंबर नेमिलें. शेतीशीं शहराचा फारसा प्रत्यक्ष संबंध नाहीं; शहरापासून शेती अलिप्त. त्याच प्रमाणें पवारांचें कार्यही फार शांत व सुव्यवस्थितपणें चालू आहे.

## मेजर हश्मतुल्लाखां.

खां साहेबांची कार्य वाहून नेण्याची हातोटी कांहीं निराळीच आहे. तहसीलदारापासून सुरवात करून आस्ते आस्ते त्यांनीं ही जागा मिळविली आहे. स्वतः इंजीनीयर नसतांहीं यांच्या कारकिर्दींत इरिगेशन खात्यानें अप्रतिम काम करून दाखविलें. एकदम कार्यात हात घालण्याची यांची धडाडी पाहिली ह्मणजे हाताखालच्या लोकांना देखील जोम येतो व क्षणांत कार्य पार पडतें. हल्लीं हे ट्रेड मेंबर आहेत.

# परिशिष्ट

## – क –

### शिंदे घराण्याचा वंश वृक्ष.

- पट्टु
  - हंगोजी
    - चंगोजी
      - दत्ताजी
        - जनकोजी
          - **राणोजी–१७४५**
            - **जयाप्पा** १७४५–५९
              - **जनकोजी** १७५९–६१
            - दत्ताजी
            - जोतीबा
            - तुकोजी
            - **महादजी** १७६१–९४
              - **दौलतराव** (दत्तक) १७९४–१८२७
                - **जनकोजी** (दत्तक) १८२७–४३
                  - **जयाजीराव** (दत्तक) १८४३–८६
                    - **माधवराव** १८८६–१९२५
                      - **कमलाराजा**
                      - **जीवाजीराव** (१९२५ पासून)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८२३२

## अभिप्राय

"....मराठी सरळ व सुबोध योजिलें आहे. सनांचा किंवा मुलांच्या ध्यानांत राहण्यास कठीण पडतील अशा गोष्टींचा उपयोग प्रमाणांत आहे. चरित्र नायकांचें स्मरण त्यांच्या उदात्त गुणांसह मुलांना सहज होईल अशाच प्रकारचें स्वभाववर्णन केलेलें आहे. सध्यांच्या बाल महाराजांचें चित्र फार मोहक आलेलें आहे...एकंदरींत हें प्रथम पुस्तक मालिकेंतील भावी पुस्तकांचें चांगलें शुभसूचक बनलेलें आहे. शाळेंत उपयोगास योग्य आहेच, पण बालोपहार या नात्यानेंही उत्तम आहे" **प्रो. आर. के. कुळकर्णी,**
एम. ए., एल. एल बी.

## शुद्धिपत्र

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | १८ | जयाप्पा | जयाप्पा शिंदे |
| ३ | १५ | पहिला | पहिले |
| ५ | १ | धनी ते | धनी तेथें |
| ६ | १४ | १७६१ | १७६९ |
| ६ | २४ | नजीब उद्दौल्याच्या | नजीब उद्दौल्याचा |
| ८ | ११ | यां | या |
| ३ | ८ | गेला | गेले |
| १३ | ७ | इसका | इतका |
| १५ | १५ | १८७४ | १७७४ |

REFBK-0004221

REFBK-0004221